# बहिणाईची गाणी

बहिणाबाई चौधरी



बहिणाबाई चौधरी

(जन्म : नागपंचमी १८८०    मृत्यू : ३ डिसेंबर १९५१)

# बहिणाईची गाणी

बहिणाबाई चौधरी

MODERN COLLEGE
LIBRARY
PUNE - 411005.

G-4508
891.461
Cha/Bah
891.461-CHA
G 4508

पॉप्युलर प्रकाशन मुंबई

Bahinaaichi Gaani
( Marathi )
Bahinabai Chaudhari

बहिणाईची गाणी
पॉप्युलर प्रकाशन
म-२६९

© सौ. सुचित्रा मधुसूदन चौधरी
२० के. हंसराजवाडी
केनेडी ब्रिज, गिरगाव
मुंबई ४०० ००४

पहिली आवृत्ती १९५२
दुसरी आवृत्ती १९६९
तिसरी आवृत्ती १९७८/१९००

मुद्रक :
चिंतामणी सदाशिव लाटकर
' शिवपार्वती '
४६१/४ सदाशिव, टिळक रोड
पुणे ४११ ०३०

प्रकाशक :
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.
३५ सी ताडदेव रोड
मुंबई ४०० ०३४

# समर्पण

नाशिक येथे माझे आई-वडील उन्हाळ्याच्या सुटीनिमित्त कविवर्य सोपानदेव चौधरी यांचेकडे उतरत असत. त्या वेळी त्यांच्या पूज्य मातोश्रीही तेथे असायच्या. आजींनी ( कै. बहिणाईंनी ) मला अंगाखांद्यावर खेळविले आहे, मांडीवर झोपविले आहे. माझ्या आईवरही त्यांची मायापाखर होती. तिला त्या मुलीप्रमाणे मानीत असत. आम्ही मुंबईकर आणि आजी खानदेशच्या; तरीपण परकेपणा न वाटता आम्हाला आपलेपणाच वाटला. कारण त्यांच्या जुनेपणातले नवेपण ! पुढे त्या माझ्या आजेसासू होतील याची मला स्वप्नातही कल्पना नव्हती. ती. आजींचे बोलणे फार ऐकावेसे वाटे. त्यात नावीन्य असायचे. आकाश निळे कसे ? तर ' धरित्रीवरची हिरवळ उडत उडत गेली अन् आभाळात निळी निळी झाली. ' हिरवी हिरवी पानं व त्याला लागलेली लाल लाल छोटी फळं बघून ' वडाच्या झाडाला पोपटाचं पीक आलं जणू ! ' वगैरे त्यांच्या कल्पना ऐकून मौज वाटत असे आणि त्यांच्या स्वतःच्या काही म्हणी ऐकून हासता हासता पुरेवाट होत असे. माझ्या सासूबाई देवपूजेच्या शेवटी ' आदिमाया ' ( या कवितासंग्रहातील पहिली कविता ) देवीची आरती म्हणून गात असत. या सर्व गोष्टींची आठवण होते. माझ्या पूज्य सासूबाई ( कै. लीलादेवी चौधरी ) यांच्यानंतर आजींच्या कवितासंग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीचे सर्वाधिकार माझ्याकडेच आलेत आणि या तिसऱ्या आवृत्तीचेही, हे मी माझे भाग्य समजते.

' माझ्यासाठी पांडुरंगा, तुझं गीता-भागवत
पावसात समावतं, माटीमधी उगवतं '

निसर्गाची ही लिपी वाचणाऱ्या निसर्गकन्या बहिणाईचे हे समग्र काव्य निसर्ग-देवतेलाच समर्पण.

**सौ. सुचित्रा मधुसूदन चौधरी**

## ऋणनिर्देश

'बहिणाईची गाणी' ह्या पुस्तकाची पहिली आवृत्ती १९५२ साली ग. पां. परचुरे प्रकाशन मंदिरातर्फे प्रकाशित झाली. १९६९ साली दुसरी आणि आता तिसरी आवृत्ती प्रकाशित करण्याची संधी दिल्याबद्दल आम्ही कवी सोपानदेव चौधरी, त्यांची सून सौ. सुचित्रा मधुसूदन चौधरी आणि श्री. ग. पां. परचुरे यांचे आभारी आहोत.

छत्तीस वर्षांपूर्वी मोठ्या चतुराईने काढून घेतलेले कै. बहिणाईंचे छायाचित्र जळगाव येथील छायाचित्रकार श्रीयुत धनसिंग एन. दालवाला ( आर्टिस्ट ) यांनी ब्लॉकसाठी दिले. याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहोत.

पहिल्या आवृत्तीला आचार्य प्र. के. अत्रे यांनी प्रस्तावना लिहिली होती. दुसऱ्या आवृत्तीत काही नव्याने सापडलेल्या कवितांचा समावेश केलेला आहे. त्या निमित्ताने आचार्य अत्रे यांनी नवीन प्रस्तावना लिहून दिली. ही प्रस्तावना त्यांनी २२ मे १९६९ रोजी म्हणजे निधनाच्या फक्त २१ दिवस आधी लिहून दिली आणि त्याची मुद्रितेही त्यांनी आपल्या अखेरच्या आजारात पाहून दिली. त्यांचे ऋण विसरणे शक्य नाही. हे बहुधा त्यांचे अखेरचे साहित्यिक लेखन असावे. तिसऱ्या आवृत्तीत बहिणाईंच्या पंचविसाव्या पुण्यतिथीनिमित्त 'लोकसत्ता' दैनिकात आलेला विख्यात कवयित्री प्रा. इंदिरा संत यांचा 'निसर्गकन्या माझ्या बहिणाई' हा लेखही या आवृत्तीत समाविष्ट केलेला आहे. सोपानदेव चौधरी यांचा प्रदीर्घ लेख यायचा परंतु पृष्ठसंख्या अधिकच वाढेल म्हणून घेतला नाही. ग. दि. मा. यांच्या जन्मदा या तिसऱ्या ग्रंथात तो दिलेला आहे.

मुंबई
१ जुलै १९७७

**प्रकाशक**

## परिमळ

## पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

एखाद्या शेतात मोहरांचा हंडा अचानक सापडावा तसा बहिणाईच्या काव्याचा शोध गेल्या दिवाळीत महाराष्ट्राला लागला. शास्त्राप्रमाणे वाङ्मयात शोध क्वचितच लागतात. सोळा वर्षांपूर्वी मराठी साहित्यात असाच एक मौल्यवान शोध लागला. लक्ष्मीबाई टिळकांची 'स्मृतिचित्रे' प्रसिद्ध झाली तेव्हा. लक्ष्मीबाईसारखाच बहिणाईचा जिव्हाळा जबर आहे. त्यांच्या शब्दाशब्दांतून प्रतिभा नुसती झिरपते आहे. असे सरस आणि सोज्ज्वळ काव्य मराठी भाषेत फार थोडे आहे आणि मौज ही आहे की, जुन्यात चमकेल आणि नव्यात झळकेल असे त्यांचे तेज आहे. एका निरक्षर आणि अशिक्षित शेतकरी स्त्रीने हे सारे रचलेले आहे हा तर तोंडात बोट घालायला लावील असा चमत्कार आहे.

सुप्रसिद्ध मराठी कवी सोपानदेव चौधरी यांच्या ह्या मातोश्री. गेल्याच वर्षी वयाच्या बाहात्तराव्या वर्षी त्या मरण पावल्या. सोपानदेवांची आणि माझी वीस-बावीस वर्षांची मैत्री आहे. पण त्यांच्या माजघरात सोन्याची खाण दडलेली असेल ह्याची मला माहिती नव्हती. त्यांना स्वतःला त्याची जाणीव असेल. पण ते पडले मुलखाचे लाजाळू. त्यांना वाटले की, खानदेशी वऱ्हाडी भाषेमधल्या आपल्या अडाणी आईच्या ओव्यांचे 'सुशिक्षित आणि सुसंस्कृत' महाराष्ट्र कौतुक करील की नाही कोणास ठाऊक ! म्हणून ते इतकी वर्षे तोंडात मूग धरून बसले.

मागल्या दिवाळीच्या आधी एक दिवस ते असेच माझ्याकडे आले. आणि एक चतकोर चोपडी हळूच उघडून त्यात उतरलेली आपल्या आईची एक कविता भीत भीत त्यांनी मला वाचून दाखविली.

यहरीत दोन मोटा
दोन्हीमधी पानी एक
मोट हाकलतो एक
जीव पोसतो कितीक ?

त्याबरोबर ती वही मी त्यांच्या हातातून खसकन् ओढून घेतली आणि आधाशासारख्या साऱ्या कविता भरभर चाळल्या. भाषेची मला कुठेच अडचण वाटली नाही. मी ओरडून सोपानदेवांना म्हणाले, 'अहो, हे बावनकशी सोने आहे ! हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे हा गुन्हा आहे.' त्याच क्षणी हे काव्य प्रसिद्ध करावयाचे आम्ही ठरविले.

प्रतिभा हे कवीला निसर्गाचे देणे आहे. ते त्याच्याबरोबरच यावे लागते. यत्नाचा किंवा विद्येचा त्याच्याशी काही संबंध नाही, हे माझे आता ठाम मत झाले आहे. कोकिळेने तोंड उघडले की आपोआप संगीत वाहू लागते. प्राजक्ताची कळी उमलली की ती सुगंधाचेच निःश्वास टाकू लागते. तसे जातीच्या कवीचे आहे. त्याचे हृदयच ताल धरून बसलेले असते. त्यामुळे त्याच्या जिभेवर शब्द जो येतो तो मुळी नाचतच येतो. सृष्टीतले सौंदर्य तेवढे त्याच्या डोळ्याला दिसते. आणि जीवनातले संगीत त्याला ऐकू येते. डोंगराच्या कपारीआडून जसा एखादा झरा उचंबळत असतो, तसे काव्य एकसारखे त्याच्या हृदयातून उसळ्या घेत असते, असे मानल्याखेरीज जगातील अमर काव्य कसे जन्माला येते हे कोडे सुटणार नाही.

बहिणाई ह्यांनी तर शाळेचे कधी तोंड पाहिले नाही. त्यांना लिहिता येत नव्हते नि वाचताही येत नव्हते. 'विठोबाचे अन् रामाचे मंदिर ह्याच माझ्या शाळा' असे त्या म्हणत. रोजचे घरातले अन् शेतामधले काम करता करता त्यांनी गाणी रचली आणि त्यांतली थोडीशी कुणीतरी टिपून ठेवली. पुष्कळशी त्यांच्याबरोबरच गेली. अशी ही एक अपढिक आणि कष्टाळू गृहिणी जात्यावर दळता दळता किंवा चूल फुंकता फुंकता 'माय भीमाई माऊली, जशी आंब्याची साऊली' किंवा 'माझ्या माहेराची वाट, माले वाटे मखमल' असले जिवंत काव्य श्वास टाकावा इतक्या सहजपणे कशी करू शकते ? कुणी म्हणेल आपल्या बायकांच्या जुन्या गाण्यांत असले काव्य वाटेल तितके आढळून येते. पण तसे नाही.

बहिणाईंच्या प्रतिभेची जात फार निराळी आहे. धरित्रीच्या कुशीत झोपलेले



बी-बियाणे कसे प्रकट होते ह्याचे त्यांनी केलेले वर्णन वाचा.

ऊन वाऱ्याशी खेयता
एका एका कोंबातून
पर्गटले दोन पानं
जसे हात जोडीसन
टाया वाजवती पानं
दंग देवाच्या भजनी

असली कल्पनेची भरारी कोणत्या जुन्या स्त्रीगीतात आढळून येईल ? मोटेचे पाणी थारोळ्यात पडलेले पाहून

बसांडली मोट
करे धो धो थायन्यात
हुंदडत पानी
जसं तान्हं पाळण्यात !

हे मनोहर चित्र जिची प्रतिभा पाहू शकते, किंवा ऐन तारुण्यात सौभाग्य गमावले असताना

लपे करमाची रेखा
माझ्या कुंकवाच्या खाली
पुसोनिया गेलं कुंकू
रेखा उघडी पडली

असे वैधव्याचे हृदयभेदक करुणकाव्य जिच्या मुखातून प्रकट होते तिचे कवित्व सामान्य आहे असे कोण म्हणेल ? सकाळी उठून बहिणाई घरोटावर म्हणजे जात्यावर बसून दळू लागल्या की, जात्यातून तिकडे पीठ पडू लागायचे अन् इकडे ह्यांच्या ओटातून काव्य सांडू लागायचे :

अरे घरोटा घरोटा
तुझ्यातून पडे पिठी

तसं तसं माझं गानं
पोटातून येतं व्होटी

हे त्यांचे वर्णनच मुळी त्यांनी स्वतः करून ठेवले आहे. स्वयंपाकघरात जाऊन त्या चूल पेटवायला बसल्या अन् चूल पेटता पेटेनाशी झाली आणि तिच्यातून नुसताच धूर बाहेर पडू लागला म्हणजे त्या काव्यामधेच संतापून त्या 'चुल्ह्या' ला म्हणत,

पेट पेट धुक्कयेला
किती वेसी माझा जीव
आरे इस्तवाच्या धन्या
कसं आलं तुले हीव

पुढे चूल पेटली, तवा तापला आणि भाकरी टाकताना हाताला चटके बसू लागले म्हणजे संसाराचां रहस्ये काव्यरूपाने त्यांच्या मुखावाटे प्रकट होत :

बरा संसार संसार
जसा तवा चुल्ह्यावर
आधी हाताला चटके
तेव्हा मिळते भाकर

'तानक्या सोपाना'ला हाऱ्यात निजवून आणि तो हारा डोक्यावर घेऊन बहिणाई शेताला निघाल्या की काव्य आपले निघालेच त्यांच्याबरोबर. वाटेत तांबड्या फळांनी लकडलेले हिरवे वडाचे झाड दिसले की लागले ते त्यांच्या ओठावर नाचायला :

हिरवी हिरवी पानं
लाल फळ जशी चोंच
आले वडाच्या झाडाला
जसं पीक पोपटाचं



रस्त्याच्या कडेला कडूलिंबाच्या झाडावरच्या पिवळ्या निंबोळ्या पाहिल्या की घेतलीच त्याने त्याच्यावर झेप :

कडू बोलता बोलता
पुढे कशी नरमली
कडू निंबोणी शेवटी
पिकीसनी गोड झाली !

समोरून पंढरीच्या दिंडीतला एखादा भाविक वारकरी दिसला की गहिवरून केलाच त्यानी त्याला प्रश्न :

अरे, वारकऱ्या तुले
नही ऊन वारा थंडी
झुगारित अवध्याले
आली पंढरीची दिंडी

शेतामध्ये कापणी चालो, मळणी चालो किंवा उपणणी चालो, काव्याने बहिणाईची पाठ कधी सोडली नाही. खळ्यात बैलाची पात सुरू झाली आणि मेढ्याभोवती बैल गरा गरा फिरू लागला, की लागलेच ते त्या बैलाला गोंजारायला :

पाय उचल रे बैला
कर बापा आता घाई
चाल्ह दे रे रगडनं
तुझ्या पायाची पुण्याई

उपणणीच्या वेळी वाऱ्याने यावयाला जरा उशीर केला की त्याने मारलीच त्याला हाक :

चाल ये रे ये रे वाऱ्या
ये रे मारोतीच्या बापा
नको देऊ रे गुंगारा
पुऱ्या झाल्या तुझ्या थापा !

शेतकऱ्याचे जीवन म्हणजे कष्टाचे. शेतकऱ्याची हाडे अखेर शेतातच मोडावयाची अन् त्याची राख तापीमाईतच पडावयाची ह्याची बहिणाईंना जाणीव होती. पण जीवनाबद्दल कृतज्ञता बाळगून शेतकऱ्याने पंढरीच्या विठ्ठलावर भरिभार ठेवावा असे त्यांचे सांगणे होते.

शेतामधी गये घाम
हाडं मोडीसनी
आता ध्या रे हरिनाम
टाया पिटीसनी

तथापि, शेतकऱ्याच्या कर्जबाजारीपणामुळं विठ्ठलाची भक्ती करणे सुद्धा त्याला किती कठीण होते ह्याचा अनुभव त्यांना नव्हता असे नाही.

अरे पांडुरंगा, तुझी
कशी भक्ती करू सांग
तुझ्या रूपापुढे येतं
आड सावकराचं सोंग.

शेतकऱ्याच्या मनाचे ह्यापेक्षा अधिक हृदयद्रावक चित्र कुणा कवीने रेखाटले असेल असे मला वाटत नाही. अशा रीतीने महाराष्ट्रातील भोळ्या, भाविक, कष्टाळू आणि समाधानी शेतकऱ्याच्या संसाराचे करुण काव्य बाळबोध आणि जिवंत जिव्हाळ्याने बहिणाईंच्या ह्या गाण्यातून प्रकट झालेले आढळून येईल.

मात्र, बहिणाईंच्या काव्याचे एवढेच वैशिष्ट्य नाही. मानवी जीवनाकडे बघण्याचे एक स्पष्ट आणि प्रभावी तत्त्वज्ञान त्यांच्याजवळ होते. एखाद्या बुद्धिमान तत्त्वज्ञान्याची किंवा महाकवीची जणू काही प्रतिभाच त्यांना प्राप्त झालेली होती. म्हणून त्यांच्या काव्याचा सर्व आविष्कार सुभाषितांचा आहे. आणि त्यांचा आत्मा उपरोधी विनोदाचा आहे.

मराठी वाङ्मयात अमर होतील अशी अनेक सुभाषिते जागोजाग त्यांच्या काव्यात विखुरलेली आढळतील. 'कशाला काय म्हणू नाही ?' या काव्यात अशा सुभाषितांचे जणू काही एक शेतच पिकलेले आहे, 'ज्यातून कापूस येत नाही त्याला बोंड म्हणू नये अन् ज्यातून हरिनाम निघत नाही त्याला तोंड म्हणू नये.



भुकेल्या पोटी जी माणसाला निजवते तिला रात म्हणू नये, अन् दानासाठी जो आखडला जातो त्याला हात म्हणू नये. इमानाला जो विसरला त्याला नेक म्हणू नये अन् जन्मदात्याला जो भोवतो त्याला लेक म्हणू नये. जिच्यामध्ये भाव नाही तिला भक्ती म्हणू नये अन् जिच्यामध्ये चेव नाही तिला शक्ती म्हणू नये' ह्या बहिणाईंच्या उद्‌गारात भाषेची आणि विचाराची केवढी देदीप्यमान श्रीमंती प्रकटलेली आहे !

महाकवी झाला तरी तो ह्यापेक्षा अधिक काय आणखी बोलू शकतो ? समर्थांनी 'मना'वर श्लोकांचा एवढा डोंगर रचून ठेवला आहे, पण—

मन पाखरू पाखरू
त्याची काय सांगू मात ?
आता व्हतं भुईवर
गेलं गेलं आभाळात ?

किंवा

मन जहरी जहरी
याचं न्यारं रे तंतर
अरे इंचू साप बरा
त्याला उतारे मंतर !

हा भाषेचा अन् विचारांचा हृदयंगम मासला 'मनाच्या श्लोका'त कुठे आढळून येईल काय ? आणि मनाच्या रचनेसंबंधी शेवटी बहिणाईंनी देवाला प्रश्न केला आहे की,

देवा, असं कसं मन
असं कसं रे घडलं
कुठे जागेपणी तुला
असं सपन पडलं !

तो तर आधुनिक पंडितांना स्तिमित करून टाकील असा आहे. जग हे मिथ्या आहे आणि संसार म्हणजे माया आहे ह्या विरक्तीच्या तत्त्वज्ञानाने महाराष्ट्रातल्या



Modern College, Pune-5

गोरगरिबांचे फार नुकसान झाले आहे. त्यांना ह्या अडाणी शेतकरी कवयित्रीने 'संसार' ह्या लहानशा कवितेत फारच सुंदर अन् सामर्थ्यवान संदेश दिला आहे. संसाराला कधी खोटा म्हणू नये. देवळाच्या कळसाला का कुणी लोटा म्हणते ? संसार म्हणजे काही नुसते रडणे अन् कुढणे नाही. गळ्यातल्या हाराला कुणी का लोढणे म्हणते ? संसार हा खिरी काकडीसारखा आहे. 'वर तोंडाला ती कडू असते पण बाकीची सारी गोडच लागते.'

कधी नगद उधार
सुखादु:खाचा बेपार
अरे, संसार संसार
असा मोठा जादुगार !

महाराष्ट्रातल्या कोणत्या संताने किंवा कवीने संसाराचे रहस्य अशा रसाळ शब्दामध्ये सांगितले आहे ? मानवी जीवनाचे रहस्य शुद्ध प्रेम आहे. स्वार्थ नाही. जीवन हे 'हृदयाचे देणे घेणे' आहे, हा बहिणाईचा दुसरा तेजस्वी संदेश आहे.

नको लागू जीवा, सदा मतलबापाठी
हिरिताचं देनं घेनं, नही पोटासाठी

ऊन आणि वारा, पाऊस खात पिके शेतात उभी असतात. कशासाठी ? भुकेल्यांच्या पोटात आम्हाला लवकर जाऊ दे रे, असा मनामध्ये ती देवाचा धावा करीत असतात. माणसांचे खोटेनाटे व्यवहार बघून तर बोरीबाभळींच्या अंगावर काटे आले तरी देखील माणसांवर उपकार करण्यासाठी त्याच्या शेताभोवती आपल्या शरीराची त्या कुंपणे करतात ! पोट कितीही भरले तरी ते शेवटी रिकामेच होणार ! अन् शरीर तर कधी तरी निघूनच जाणार ! मागे जे काही शिल्लक राहणार ते फक्त हृदयाचे देणेघेणे. दुसरे काही नाही. शुद्ध आणि निःस्वार्थी प्रेमाचे यापेक्षा अधिक हृदयंगम स्तोत्र कोण लिहू शकेल ?

बहिणाईंना सर्वांत कशाची जास्त चीड असेल तर ती माणसाच्या स्वार्थातून निर्माण झालेल्या त्याच्या कृतघ्नपणाची ! त्या माणसाला संतापून म्हणतात, 'माणसा, तुला नियत नाही रे. तुझ्यापेक्षा ते गोठ्यातले जनावर बरे. गाय न



म्हैस चारा खाऊन दूध तरी देतात. तुझे एकदा पोट भरले की तू उपकार साफ विसरून जातोस. कुत्रा आपले शेपूट इमानीपणाच्या भावनेने हालवतो. तर माणसा, तू आपली मान मतलब साधण्यासाठी डोलवतोस. केवळ लोभामुळे तू माणूस असूनही काणूस म्हणजे पशू झाला आहेस.' एवढे सांगून झाल्यानंतर बहिणाईंनी माणसाला तळमळून विचारले आहे :

मानसा, मानसा
कधी व्हशील मानूस

मानवतेलाच जणू काही त्यांनी हे व्याकुळ हृदयाने आवाहन केले आहे ! स्वार्थाचा वणवा सर्व जगभर आज पसरलेला आहे. माणसे पशू होऊन एकमेकांशी झगडत आहेत. मानवता आज रक्तबंबाळ झाली आहे. म्हणूनच 'माणसा, माणसा, कधी होशील माणूस ?' हीच आर्त हाक मानवतेच्या कल्याणासाठी तळमळणाऱ्या संतमहात्म्यांच्या कारुणिक अंतःकरणातून उचंबळते आहे ! माणसाने माणूस कसे व्हायचे हीच प्रचंड समस्या मानवजातीपुढे आज उभी आहे.

ह्या समस्येचा साक्षात्कार बहिणाईंसारख्या खानदेशातील एका अडाणी शेतकरी महिलेला व्हावा हा तिच्या प्रतिभासामर्थ्याचा केवढा पडताळा आहे ! माणसांच्या कल्याणाचा जे नुसता कांगावा करतात ते पंडितकवी 'नराचा नारायण' करण्याच्या वारेमाप वल्गना करीत असतात. पण माणसाच्या जन्माला येऊन तो अजून पुरता माणूसही झाला नाही, हे मानवतेच्या व्याधीचे अचूक निदान ह्या अपढिक कवयित्रीने केले आहे.

गडकरी आणि कोल्हटकर ह्यांच्यासारख्या प्रगल्भ विनोदपंडितांना शोभेल असला कोटिबाज आणि उपरोधिक विनोद बहिणाईंनी आपल्या काव्यात सहज केलेला आहे हा त्यांच्या प्रतिभेचा दुसरा चमत्कार आहे

भाऊ 'घमा' गाळी घाम
'गणा' भगतगणात

ही शब्दांची मौज जाता जाता त्या साधू शकतात. तथापि, ज्यातून पीठ 'येते' त्याला 'जाते' का म्हणतात, जो जमिनीत 'उभा' आहे त्याला 'आड' का म्हणतात किंवा ज्या दिवशी आपण गुढी 'उभारतो' त्या दिवसाला पाडवा का

म्हणतात ही बहिणाईची विनोदी पृच्छा मार्मिक नाही असे कोण म्हणेल? विचारांचा आणि वर्णनाचा विनोद करण्यातही त्यांचा चांगलाच हातखंडा होता. चार ओळींच्या काव्यात चौथ्या ओळीत विनोदाचा 'स्फोट' साधावयाचा हे आधुनिक तंत्र सुद्धा त्यांना अवगत होते.

'फाट आता टराटर,
नाही दया तुफानाला'
हाले बाभळीचे पान
बोले केळीच्या पानाला

उंच्या खुज्या जोडप्याची
कशी जमली रे जोड
उगे ताडाखाली जसं
भुईरिंगणीचं झाड!

अथवा

भरली विहीर
मोट चाले भराभर
कशाला करते
कणाचाक कुरकुर!

हे बहिणाईंच्या सुभाषितात्मक विनोदी उपरोधाचे काही तेजस्वी नमुने होत. काही आप्तांची आणि स्थानिक व्यक्तींची जी शब्दचित्रे त्यांनी रेखाटलेली आहेत ते तर वर्णनात्मक विनोदाचे बहारदार मासलेच होत. तोंडात विडी आणि हातात छडी घेऊन चालणाऱ्या मुनीर नावाच्या चकण्या कमिटीच्या शिपायाचे वर्णन वाचून तर कुणालाही हसूच येईल. 'छोटू भय्या'च्या पोटाचे वर्णनही तसेच हास्यकारक आहे.

बहिणाईंची चुलत सासू 'भिवराई' ही मोठी विनोदी होती. ती अनेकांच्या नकला करून लोकांना हसवी. तिचे वर्णन करता करता बहिणाईने विनोदाचा एक मोठा सिद्धान्तच सांगून ठेवला आहे.



नाव ठेवी अवघ्याला
करि सर्वांची नक्कल
हासवता हासवता
शिकवते रे अक्कल!

माणसांना हसवून शहाणे करावयाचे हाच विनोदाचा प्रधान हेतू आहे. त्याचा बोध समाजातील कित्येक गंभीर विद्वानांना झालेला नाही. पण बहिणाईने विनोदाचे हे सामर्थ्य ओळखलेले होते. बहिणाईच्या विनोदात नुसता उपरोध नाही. त्यात सहानुभूतीचा आणि कारुण्याचा ओलावा ओथंबलेला आहे.

त्या दृष्टीने 'खोकली माय' ही कविता वाचून पाहण्यासारखी आहे. जळगावात खोकल्याची मोठी साथ आली. सारे लोक हैराण झाले. इतक्यात एक म्हातारी भिकारीण गावात आली. आणि 'काहीतरी धर्म करा' असे म्हणू लागली. तेव्हा गावातला एक म्होरक्या चिडून म्हणाला, 'गावातला सारा खोकला तुला देऊन टाकला. जा!' म्हातारीने ते दान स्वीकारले. ती म्हणाली, 'माझ्या कर्मात जे दान आहे ते मला घेतलेच पाहिजे.' अशा तऱ्हेने साऱ्या गावाचा खोकल्याचा वाटा म्हातारीने पत्करला, तेव्हा गावातली खोकल्याची साथ नाहीशी झाली. पण ती म्हातारी मात्र पुढे एका गल्लीत चोवीस तास खोकत बसायची. लोक तिला 'खोकली माय' म्हणावयाचे आणि कुणाला खोकला आला तर तो जावा म्हणून ते हात जोडून तिच्या पाया पडावयाचे.

ह्या कवितेतला विनोद हृदयाला पीळ पाडणारा आहे. 'गोसाई' आणि 'जयरामबुवा' ह्यांच्या बहिणाईंनी सांगितलेल्या आख्यायिकाही हृदयस्पर्शी आहेत. दंतकथांवर आधारलेल्या अशा कविता मराठीमध्ये फारच थोड्या आहेत.

रचनेच्या आणि भाषेच्या दृष्टीने बहिणाईचे काव्य अत्यंत आधुनिक आहे. प्रत्येक काव्यामध्ये एक संपूर्ण घटना किंवा विचार आहे. त्याचा प्रारंभ आणि अखेर परिणामाच्या दृष्टीने नाट्यात्मक व्हावा ह्याबद्दल त्यांचा कटाक्ष आहे. शब्दांचा किंवा विचारांचा फार विस्तार न करता थोडक्यामध्ये एखादी भावना जास्तीत जास्त प्रभावाने कशी व्यक्त करता येईल ह्याकडे त्यांनी विशेष लक्ष दिलेले आहे. त्या दृष्टीने मराठी भाषेवरचे त्यांचे प्रभुत्व केवळ अद्भुतच म्हटले पाहिजे.

रसाच्या आणि ध्वनीच्या दृष्टीने कुठेही ओढाताण किंवा विरस न होईल अशा कौशल्याने त्यांनी सोपे सोपे आणि सुंदर सुंदर शब्द वापरले आहेत. त्यांच्या खानदेशी वऱ्हाडी भाषेने तर त्यांच्या काव्याची लज्जत अधिकच वाढविली आहे असे माझे मत आहे. ' अशी कशी वेडी ग माये ' ह्यापेक्षा ' अशी कशी येळी व माये ' किंवा " पाणी ' लौकीचं ' नितळ। त्याला अमृताची गोडी " ह्यापेक्षा " पानी ' लौकीचं ' नित्तय । त्याले अम्रीताची गोडी " ह्या भाषेत अधिक लाडकेपणा वाटतो. एखादे गोजिरवाणे बालक बोबड्या भाषेत बोलताना आपल्याला जसा आनंद होतो, तसे बहिणाईचे काव्य वाचताना मनाला नि कानाला वाटते.

अहिराणी आणि खानदेशी-वऱ्हाडी ह्या जरी मराठीच्या बोली असल्या तरी अहिराणीपेक्षा खानदेशी-वऱ्हाडी ही शुद्ध मराठीला अधिक जवळची आहे. ' ळ 'च्या ऐवजी ' य ', ' ण 'च्या ऐवजी ' न ', जोडून, वाहून किंवा करून ह्यांच्या ऐवजी जोडीसन, वाहीसन आणि करीसन, तुला मला ह्याऐवजी तुले मले ह्याखेरीज आणि शब्दांच्या खेडवळ रूपाखेरीज उभय भाषेत विशेष फरक नाही. असो.

ज्या काळात केशवसुत, विनायक, तांबे, ' बी ' किंवा गोविंदाग्रज हे महाराष्ट्राचे प्रतिभाशाली कवी आपल्या काव्याचा बहार महाराष्ट्रावर उधळीत होते, त्याच काळामध्ये जळगावात राहणाऱ्या एका शेतकऱ्याच्या घरात एक अडाणी मराठी गृहिणी जात्यावर दळता दळता किंवा शेतामध्ये काम करता करता आपल्या खेडवळ भाषेत ' संसाराची गाणी ' गात होती. या गाण्यामध्ये जातिवंत जिव्हाळ्याचे आणि अलौकिक प्रतिभेचे काव्य प्रगट होत होते ह्याची वर्षानुवर्षे कोणाला जाणीव नव्हती. ते काव्य इतक्या विलंबाने का होईना आज प्रकाशित होत आहे, हे मराठी भाषेचे केवढे भाग्य होय.

अभिजात आधुनिक मराठी कवितेत मागून येऊनही बहिणाई आघाडीवरले मानाचे स्थान पटकावून बसणार ह्यात काय शंका ? मराठी मनाला मोहिनी घालील आणि स्तिमित करून टाकील असा भाषेचा, विचारांचा आणि कल्पनेचा विलक्षण गोडवा त्यांच्या काव्यात शिगोशीग ओथंबलेला आहे. आणि



मानसा, मानसा,
कधी व्हशील मानूस !

ह्या मानवतेला त्यांनी दिलेल्या अमर संदेशाने तर मराठी वाङ्मयात त्यांचे स्थान अढळच करून ठेवलेले आहे !

खंडाळा
३ डिसेंबर १९५२

**प्रल्हाद केशव अत्रे**

## दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

'बहिणाईची गाणी' या कवितासंग्रहाच्या पहिल्या आवृत्तीनंतर पंधरा वर्षांच्या दीर्घकालानंतर ही दुसरी आवृत्ती प्रसिद्ध होत आहे. पहिली आवृत्ती इतक्या घाईघाईने प्रसिद्ध झाली, की कवयित्रीच्या सर्वच कविता जमा करून त्या त्या आवृत्तीत समाविष्ट करण्यास मुळी अवसरच मिळाला नाही. पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाल्यानंतर १९५३ साली ज्या काही अपुऱ्या कविता नि काही स्फुट ओव्या सोपानदेवांना मिळाल्या त्या कटाक्षाने या आवृत्तीमध्ये संग्रहित केल्या आहेत. सदर ओव्या विशेषतः 'नवयुग' मध्ये अन् इतर नियतकालिकांतून त्या त्या वेळी प्रसिद्ध झालेल्या आहेत. इतकेच नव्हे तर गेल्या पंधरा वर्षांत त्या रसिकांना मुखोद्गत होऊनही बसल्या आहेत. त्यातील एक कविता 'अरे खोप्यामधी खोपा' ही एका चित्रपटात येऊनसुद्धा गेली आहे. मराठी रसिकांनी नवीन उपलब्ध झालेल्या या कवितांचे मनःपूर्वक स्वागत केलेले आहे. ह्याव्यतिरिक्त आता मात्र एकही ओवी मिळणे शक्य आहे असे आम्हांस वाटत नाही.

बहिणाईच्या काव्याची भूमिका ध्यानी येण्यासाठी 'माझी माय सरसोती' ही कविता पाहा. एका बाईने ( राजसआत्याने ) बहिणाईला विचारले, 'तुला एवढे हे शिकवतो कोण ? माझ्यासारखीच तू ना शिकलेली, ना पढलेली. तुला ही गाणी सुचतात तरी कशी ? ही बोली तुला कोण शिकवतो ?' त्या प्रसंगाला दिलेले हे उत्तर बघण्यासारखे आहे.

"माझी माय सरसोती, माले शिकवते बोली
लेक 'बहिनाच्या' मनी किती गुपितं पेरली



माझ्यासाठी पांडुरंगा, तुझं गीता-भागवत
पावसात समावतं, माटीमधी उगवतं"

मी ते वाचते आणि गाऊ लागते. सूर्यबापा हृदयात येतो आणि मला अरूपाचं रूप दावतो.

'देवाचं दर्सन झालं झालं आपसुक
हिरिदांत सूर्यबापा दाये, अरूपाचं रूप
तुझ्या पायाची चाहूल, लागे पानापानामधी
देवा, तुझं येनं जानं, वारा सांगे कानामधी'

मला रंग कोण शिकवतो ?

'किती रंगवशी रंग, रंग भरले डोयात
माझ्यासाठी शिरीरंग, रंग खेये आभायात'

ते आभाळ मला रंग शिकवते. धरतीचा वास फुलाफुलांमध्ये सामावला.

'फुलामधी समावला, धरतीचा परिमय ( परिमळ )
माझ्या नाकाले इचारा, नथनीले त्याचं काय ?
धर्तीमधल्या रसानं, जीभ माझी सवाहते ( स्वादाला येते )
तव्हा तोंडातली चव, पिंडामधी ठाय घेते'

'तोंडातल्या चवीने पिंडात ठाव घेतला नाही तर त्या चवीचा उपयोग काय ?'

महात्मा कबीर म्हणतात, 'मसी कागज को छूयो नही रे' [ मला कागद आणि शाई यांचा स्पर्श झाला नाही.] परंतु त्यात परतत्त्वाचा स्पर्श झालेला होता. बहिणाईच्या काव्याबाबत हेच मर्म बोलून उठते असे या कवितेवरून दिसून येईल.

'माहेराची वाट' या कवितेतील शेवटच्या ओळी आम्ही आमच्या 'मी कसा झालो' या ग्रंथात 'मी कोण आहे ?' या प्रकरणात घेतल्या आहेत. याव्यतिरिक्त 'वाटवरल्या दगडा, तुले फुटली रे वाचा' या कवितेत तो दगड म्हणतो,

नीट जाय मायबाई, नको करू धडपड
तुझ्याच मी माहेराच्या, वाटवरला दगड

असे असता मला लाथाडून जातेस ? काही झाले तरी तुझ्या माहेराच्या वाटेवरचा मी दगड ! ' माझ्या जीवा ' मध्ये त्या म्हणतात—

देवानं जीव धाडला. जन्म म्हणतो, ' आला आला ' मौत म्हणते, ' गेला गेला. '

नही सरलं सरलं, जीवा तुझं येनं जानं
जसा घडला मुक्काम, त्याले म्हनती रे जीनं

जीवनाची ही सुटसुटीत व्याख्या !

दीस आला कामामधी, रात नीजमधी गेली
जलमाची जाग जाता, मरनाची नीज आली

जगणे आणि मरणे यातील अंतर बघा !

आला सास, गेला सास, जीवा तुझं रे तंतर,
अरे जगनं—मरनं, एका सासाचं अंतर !

जगणे आणि मरणे यामध्ये फक्त एका श्वासाचे अंतर !

येरे येरे माझ्या जीवा, काम पडलं अमाप
काम करता करता, देख देवाजीचं रूप !
हास हास माझ्या जीवा, असा संसारात हास
इडा पीडा संकटाच्या, तोंडावऱ्हे काय फास

पतिनिधनाच्या वेळी स्त्रिया दुःख हलके करण्यासाठी, समजूत घालण्यासाठी घरी आल्या. त्यांना उद्देशून ही कविता असावी. नाव आहे ' आता माझा माले जीव '; रडता रडता आसू सरले. आता आसवांबिगार माझ्या जीवा, तू उगाचंच का रडतोस ? पत्नी ही पतीची सावली. बहिणाई म्हणते—



सांग सांग धर्ती माता, अशी कशी जादू झाली
झाड गेलं निघीसनी, मांघे सावली उरली !

झाड निघून गेलं. मी कशी मागे उरली ?

रडू नको माझ्या जीवा, तुला रडण्याची रे सव ( सवय )
रडू हासव रे जरा, त्यात संसाराची चव !

आणि मग कवयित्री म्हणते,

जरी फुटल्या बांगड्या, मनगटी करतूत
तुटे मंगयसूतर, उरे गयाची शपथ

मनगटावरच्या बांगड्या फुटल्या; परंतु मनगटातील करतूत ( कर्तृत्व ) कुणी हिरावू शकत नाही. मंगळसूत्र तुटलं; तरीपण पतिदेवाची शपथ गळ्यात अडकलेली आहे; ती तुटता तुटणारी नाही.

नका नका आया बाया, नका करू माझी कीव
झालं माझं समाधान, आता माझा माले जीव

आता माझे कर्तृत्व आणि मी !

' सासुरवाशीण आणि योगी ' या कवितेतील बऱ्याच ओव्या सुटलेल्या आहेत. त्यामुळे कथानक सहसा लक्षात येत नाही. एक सासुरवाशीण शेतामध्ये कुंपणाच्या बाजूला निंदणी खुरपणी करीत आहे. माहेरची गाणी गात आहे. त्याच्या बाहेरच्या बाजूला एक योगी ( साधू ) ईश्वराचे चिंतन करीत बसला आहे. परंतु त्या बाईच्या तोंडची माहेरची गाणी त्याला अडथळा वाटतात. तेव्हा तो साधू रागावून बोलतो,

माझं माहेर माहेर, सदा गानं तुझ्या ओठी
मंग माहेरून आली, सासराले कशासाठी ?

त्यावर सासुरवाशीण म्हणते, ' अरे योग्या,

अरे लागले डोहाये, सांग शेतातली माटी
गाते माहेराचं गानं, लेक येईल रे पोटी '

'लेक पोटी येईल. कुणाला का मुली होत नाहीत? माहेराचं गाणं कशाला गातेस आणि माझ्या ध्यानात अडथळा करतेस?' ह्यावर सासुरवाशीण म्हणते, योग्या, तुला नाही कळायचं!

अरे देरे योग्या ध्यान, ऐक काय मी सांगते
लेकीच्या माहेरासाठी, माय सासरी नांदते

'माझ्या मुलीला माहेर मिळावं म्हणून मी सासरी आले! समजलास?' ह्यावर योगी शरमिंदा होतो. बोलायचे म्हणून तो बोलतो, 'पण ह्यापेक्षा तू देवाचं नाव का घेत नाहीस? तेवढंच पुण्य घडेल!' ह्यावर सासुरवाशीण म्हणते —

'अरे देव कुठे, देव कुठे? भरीसनी जो उरला
अरे उरीसन माझ्या, माहेरात सामावला

ह्या वेळी माझ्या माहेरात मला देव दिसत आहे. तेव्हा योगी दंड कमंडलू घेऊन तेथून पसार होतो.

घरापासून मळ्याकडे जाताना गावातल्या काही ठिकाणची दर्शने घडविली आहेत. त्यातील तीनचार स्थाने उद्ध्वस्त झाली आहेत. या ओव्यांतील कोणकोणते स्थळ उद्धृत करावे ते समजत नाही. तरी पण 'नानाजीं'च्या छापखान्याचे (बाबाजी प्रिंटिंग प्रेस) थोडक्यात वर्णन आहे. त्यात—

मानसापरी मानूस राहतो रे येडजाना (अनपढ, निरक्षर)
अरे होती छापीसनी, कोरा कागद शाहाना

कोरा कागद छापून शहाणा होतो; परंतु माणसासारखा माणूस कोराच्या कोराच राहतो.

एका सावकाराने (नाईक) पुतण्याचा खून केला. पुरून ठेवलेल्या धनावर तो भूत होऊन बसला. भूत असल्यामुळे सुंदर घडणीची ही हवेली ओस पडली. अजून ही हवेली आहे. तीमध्ये कुणीच राहात नाही.

भुईमधी रे डबोलं, डोयीं पापाचं टोपलं
अरे मानसाचं भूत, मानसानं रे घडलं



'भूताच्या हायली (हवेली)' नंतर 'बाळाजी मंदिर' लागते. ते बघून जुन्या गावातल्या शेतकऱ्याच्या विठ्ठल मंदिराची कवयित्रीला आठवण होते –

सोन्यारूप्यानं मढला, मारवाड्याचा बालाजी
शेतकऱ्याचा इठोबा, पानाफुलामधी राजी!

सोनाराने मडक्याचा आवा लावला, कुंभार तोडे घडवतो, लोहार वाहाण शिवतो, चांभार विळा घडवतो, पिंजारी चिरा घडवतो, बेलदार पेढे करतो, महार पोथी वाचतो, ब्राह्मण ढोरं ओढतो, असे विपरीत दृश्य बघून कवयित्री म्हणते,

काय कामाची वाटनी, झाला गावाचा खैमाना (खेळखंडोबा)
अरे असा कसा गाव, त्याले ठाव ना ठिकाना!

'नही दियामधी तेल' मध्ये रंगविलेले गरिबीचे चित्र. परंतु तेही खेळीमेळीचे अन् शेवटी विनोदात पर्यवसान झालेले. काळीकुट्ट अंधारलेली रात्र. दिव्यात तेल नाही. एकदाचे तेल मिळाले तर वात उंदराने नेली. कशीतरी चिंधीवात केली. परंतु आगपेटी — आग्यावेताळाची लेक — तीच सापडेना. एकदाची आगपेटी मिळाली. परंतु तिच्यामध्ये लाडानवसाची एकच काडी. काडी शिलगावली. ज्योत पेटते न पेटते तोच गर्द अंधाराला भिऊन विझून गेली.

'माझी मुक्ताई मुक्ताई' ही त्र्याच ओव्या सुटलेली एक अपूर्ण कविता आहे. मुक्ताईला ताटीचे अभंग कसे स्फुरले तो प्रसंग! संन्याशाची पोरं म्हणून लोक चिडवू लागले. अशा टाकून दिलेल्या मुलांचे तोंड पाहू नये असे म्हणू लागले –

असं कसं माझं तोंड, कसं दावू मी लोकाले
ताटी लाई (लावून) ग्यानदेव, घरामधी रे दडले
उबगले ग्यानदेव, घडे असंगाशी संग
कयवयली मुक्ताई, बोले ताटीचे अभंग

ते ताटीचे अभंग कसे? तर—

घेती हिरीदाचा ठाव, ऐका ताटीचे अभंग
एका एका अभंगात, उभा केला पांडुरंग

'देव दिसला, देव कुठे ?' यातील पाच ओव्यांपैकी दोन ओव्या महत्त्वाच्या वाटतात.

डोये मिटले मिटले, सोतालाबी इसरला
अरे आंधाऱ्यात त्याले, देव दिसला दिसला
देव कुठे देव कुठे, तुझ्या बुबुयामझार
देव कुठे देव कुठे, आभायाच्या आरपार !

इतका तो जवळ आहे. इतका तो दूर आहे !

आला आला रायरंग, करे लोकाचं रंजन
हासवता हासवता, घाले डोयात अंजन

दारी किनरीवाला, एकतारीवाला, बहुरूपी असे गुणी लोक आले तर त्यांना भिकारी म्हटलेलं कवयित्रीला मुळीच आवडत नसे.

आला रायरंग दारी, त्याचं फेडा तरी रीन
अरे थकले भागले, त्याचा घालवतो शीन
नका म्हणू रे भिकारी, जरी तुम्ही नानावटी
करा गुनाची कदर, हात घाला कनवटी

'रायरंग' हा शब्द 'रंगराज' या शब्दापासून निघाला असला पाहिजे असे वाटते. खानदेश-वऱ्हाडात बहुरूप्याला 'रायरंग' म्हणतात असे सोपानदेवांकडून आम्हाला समजले.

माणसाला अहंकार कामाचा नाही. कारण तो भुकेने व्याकुळ झाला म्हणजे अन्नाचा एक घास त्याच्यापेक्षा श्रेष्ठ असतो. तहानेने व्याकुळ झाला म्हणजे पाण्याचा घुटका श्रेष्ठ असतो व तोच माणसाला विचारतो, 'आता तू कोण ?'

'मी कोन ?' [ अहंकार ] या कवितेत बहिणाई म्हणतात –

मी कोन मी कोन ? जव्हा लागली तहान
तव्हा पान्याचा घुटका, म्हने तू कोन तू कोन ?

सर्व दुनियेच्या राजालासुद्धा मीपणामुळे काय मिळते ? तर



सर्व्या दुनियेचा राजा, म्हणे मी कोन मी कोन ?
अशा त्याच्या मीपनाले मसनात सिंव्हासन
अरे मी कोन ? मी कोन ? मीपनाची मरीमाय
देखा हिची कशी तऱ्हा, सोता सोतालेच खाय

मीपणाची 'मरीमाय' स्वतः स्वतःलाच खाऊन टाकते.

'पर्शुराम बेलदार' हा विटांचा कारखानदार (भट्टीवाला) गावाला विटा पुरवीत असे. यंदा पंढरीला जाऊ, पुढच्या वर्षी जाऊ असे करता करता पंढरीला जाणे लांबत चालले. तो पंढरीला गेला नाही. त्याचे सर्व चित्त विटांच्या आव्या-कडेच होते. त्याला उद्देशून या कवितेत कवयित्री म्हणते– 'अरे पर्शुराम! तू लाखो विटा पाडल्या, भट्टीत भाजल्या. तू लाखो विटा पाहिल्या असतील. परंतु—

अरे सर्व्या जगामधी, तूनं कधी ना देखली
अशी देख एक ईट, इठ्ठलाच्या पायाखाली

ती वीट तर पाहशील! तिला दंडवत घाल!

भट्टीतल्या इटावरी, तुझ्या संसाराचा रंग
तठी एका इटेवरी, देख उभा पांडरंग

कवयित्रीची ही कल्पना अद्भुतरम्य वाटते.

काही स्फुट ओव्यांचा उल्लेख येथे करणे आवश्यक आहे. अगोदरच जग रडते. रडता रडताच माणसाचा जन्म झाला. त्याला आणखी रडवू नये.

माझं दुखं माझं दुखं, जशी अंधारली रात
माझं सुख माझं सुख, हातातली काडवात

ती काडवात घेऊन जगाला सुखी करावे.

माझे दुखं माझे दुखं, तयघरात कोंडले
माझे सुख माझे सुख, हांड्या झुंबर टांगले
माय म्हनता म्हनता, ओठ ओठालागी भिडे
आत्या म्हनता म्हनता, केव्हडं अंतर पडे

' माय ' म्हणताना ओटाला ओठ भिडतो. आत्या म्हटले म्हणजे ओठात केवढे अंतर पडते. दोघींच्या प्रेमात अंतर पडणारच.

' ताता ' म्हनता म्हनता, दातामधी जीभ अडे
' काका ' म्हनता म्हनता, कशी मांघे मांघे दडे

बाप आणि चुलता यांच्यात अंतर पडणारच !

' जीजी ' म्हनता म्हनता, झाला जिभेले निवारा
' सासू ' म्हनता म्हनता, गेला तोंडातून वारा

जिजी ( मावशी ) आणि सासू यांच्या प्रेमामध्ये हे असे अंतर पडणारच. या तिन्ही ओव्या एखाद्या भाषाशास्त्रज्ञाने लिहिल्या असाव्यात अशाच !

' कोणती वस्तू केव्हा घडली ' या विषयावर बहिणाईंच्या बऱ्याच ओव्या होत्या. त्यांतील दोनच मिळाल्या. किल्ल्याकुलपांचा नि बेड्यांचा जन्म कधी झाला ते पाहा—

जव्हा इमान सचोटी, पापामधी रे बुडाले
तव्हा याच मानसानं, किल्ल्या कुलूप घडले
किल्ल्या राह्यल्या ठिकानी, जव्हा तिजोऱ्या फोडल्या
तव्हा याच मानसानं, बेड्या लोखंडी घडल्या

काही उत्स्फूर्त म्हणी आहेत. त्यांतील बहुतेक मुखोद्गत करण्यासारख्या आहेत.

म्हननारानं म्हण केली, जाननाराले अक्कल आली

बहिणाईंच्या काव्यामध्ये असे एकेक लोकोत्तर गुण आहेत की त्यांची प्रशंसा करावी तेवढी थोडीच आहे. पहिल्या आवृत्तीतल्या कवितांच्या तेजस्वी कल्पनांवर नि शैलीवर दुसऱ्या आवृत्तीत समाविष्ट केलेल्या नवीन कवितांनी सुवर्णकळस चढविला आहे ! आता बहिणाईंच्या या काव्यसंग्रहाने अर्वाचीन मराठी साहित्याला प्राचीन मराठी साहित्याचे वैभव आणि प्रतिष्ठा प्राप्त करून दिलेली आहे असाच उद्याच्या टीकाकारांना निर्वाळा द्यावा लागेल !

शिवशक्ती, २२ मे १९६९ **प्रल्हाद केशव अत्रे**



# माझी आई

' बहिणाईची गाणी ' हा माझ्या आईचा कविता-संग्रह प्रसिद्ध होत असलेला पाहून वीस वर्षांपूर्वीची एक आठवण मला होत आहे. १९३२ साली विद्यार्थि-दशेत लिहिलेल्या माझ्या कवितांचा ' काव्यकेतकी ' नावाचा एक संग्रह प्रसिद्ध झाला. त्या पुस्तकाच्या आरंभी अर्पणपत्रिका म्हणून माझ्या आईचे छायाचित्र देऊन त्याखाली कवितेची मी एक ओळ दिली होती, ' तुझेच यश माउली, तुजसि आज मी अर्पितो ! ' ' तुझेच यश ' या शब्दांत फार मोठा अर्थ भरलेला आहे. ते यश म्हणजे दुसरेतिसरे काही नसून माझ्या आईच्या गोड ओव्यांपासून मला मिळालेली काव्यस्फूर्ती होय ! मी मराठी शाळेत असताना ( मला वाटते चौथ्या इयत्तेत असेन ) जुनी पुस्तके चाळीत होतो. पुस्तके चाळता चाळता दुसऱ्या इयत्तेचे पुस्तक माझ्या हाती आले. शाईचे डाग पडलेल्या माझ्या काही विशिष्ट खुणा त्या पुस्तकात मी हुडकीत होतो. तोच माझ्या आवडीचा एक धडा मला दिसला. त्याचा मथळा ' सावित्रीचे चातुर्य '. तो धडा मोठ्या ऐटीत मी जोरात वाचू लागलो. आई माझ्याजवळ येऊन लक्षपूर्वक ऐकत होती. मला वाटले माझ्या अशिक्षित आईला त्यातले काय कळणार ? त्यानंतर सकाळी रामप्रहरात आई दळायला उठली. जात्याच्या घरघरीबरोबर तिच्या ओठांतून बाहेर पडणाऱ्या मंजुळ ओव्या माझ्या कानी पडताच मी तिच्या मांडीवर डोके ठेवून पडलो. आई ओव्या गात होती :

सायत्री सायत्री, सत्येवानाची सावली
निघे सत्यवान, त्याच्या मागून धावली

ह्या दोनच ओळी आता मला आठवतात. दुर्दैवाने सर्व ओव्या आज उपलब्ध

हीनात. दळण सरल्यावर मी आईला विचारले, ' या ओव्या तुला कुणी शिकवल्या? ' त्यावर ती म्हणाली, ' कालदी तुनं माले धडा वाची दाखवला त्याचज गानं माह्या मनानं मी म्हनत व्हती ! ( काल तू मला धडा वाचून दाखविला त्याचंच गाणं मी माझ्या मनाने गात होते ). ' तिचे हे उत्तर ऐकताच मी थक्क झालो.

त्यानंतर तुरखेडे येथील माझे मावसबंधू आमचे घरी शिकायला म्हणून राहिले होते. ते आईला नेहमी ओव्या म्हणायला लावीत असत उतरूनही घेत असत. मीही सापडेल त्या कागदावर उतरून घेत असे. श्रावण महिन्यात पावसाची झडी लागली म्हणजे शेतकऱ्यांना घरातच दडून बसावे लागते. त्या वेळी करमणूक म्हणून आम्ही आईला ओव्या गायला सांगत असू. ' आला पाऊस पाऊस ' वगैरे ओव्या अशा वेळीच उतरून घेतल्या होत्या. आईच्या ओव्यांचे खरे कौतुक आम्हां दोघांनाच होते. बाकीच्यांना गाणी गात बसणे म्हणजे रिकामटेकडेपणा वाटे. ते त्याची अवहेलना करीत. या असल्या गोष्टीकडे आम्ही लक्ष देत नसू. १९२६ साली मी जळगाव सोडले. नाशिक येथे शिक्षणासाठी आलो. त्यानंतर १९३१ साली ग्वाल्हेर येथे शिक्षणासाठी गेलो. त्या गडबडीत आईच्या ओव्या कुठे तरी गहाळ झाल्या. मूग गिळून बसलो होतो. तरी पण बऱ्याच स्फुट ओव्या आणि गाण्याची काही कडवी माझे स्मरणात होती. तेवढी मी केव्हातरी गुणगुणत असे. गतवर्षी माझी आई निवर्तल्यानंतर दहा दिवसांनी सुतक फिटण्याच्या दिवशी बळदातील काही सामान उपशीत असताना, एक जुनी गंजलेली अन् चेपलेली ट्रंक मला आढळली. त्यात मला आईच्या ओव्यांची वही आणि काही जुने सामान आढळले. त्याच सुमारास पू. दादा धर्माधिकारी नाशिक येथे माझे घरी आले होते. मी एक दोन गाणी म्हटली. त्यांना ती मनापासून आवडली. मध्यंतरी काही ओव्या प्रबोधनकार ठाकरे यांना म्हणून दाखवल्या. त्यांनीही त्यांचे मनापासून कौतुक केले. त्यानंतर आठ-नऊ महिन्यांनी अमळनेरहून प्रा. मधुकर फाटक यांचे मला एक पत्र आले. अमळनेर साहित्य संमेलनानिमित्त निघणाऱ्या प्रातिनिधिक कवींच्या ' तापीतीरावर ' या कवितासंग्रहासाठी त्यांनी कविता मागविली होती. आईची एक आणि माझी एक ( येहरीत दोन मोटा ), अशा दोन कविता मी त्यांना पाठविल्या. दोन्ही कविता विशेषतः आईची कविता त्यांना फारच आवडल्याचे दिसून आले.

त्याच सुमारास मी मुंबईला काही कामासाठी आलो होतो. नेहमीप्रमाणे आचार्य अत्रे यांना भेटायला गेलो... माझ्याजवळची वही काढून मी जरा संकोचानेच एक गाणे ( कशाला काय म्हणू नये ? ) त्यांना गाऊन दाखविले. त्यांनी माझ्या हातची वही खसदिशी ओढून घेतली. सर्व कविता त्यांनी वाचून काढल्या. आणि मला ते म्हणाले, ' अहो, हे बावनकशी सोने आहे. हा मोठा ठेवा आहे. आतापर्यंत का लपवून ठेवला ? ' मी काय उत्तर देणार ? ' लहानपणापासून लिहिलेल्या माझ्या स्वतःच्या कविता बारा वर्षांनी १९३२ साली मी प्रसिद्ध केल्या. तुम्हीच पुण्याच्या पहिल्या कविसंमेलनात मला ओढून आणले व उभे केले. त्याच दिवशी मी महाराष्ट्राला परिचित झालो. ' आचार्यांच्यासमोर खाली मान घालून मी हे उद्गार काढले. त्याच दिवशी मी नाशिक येथे परत जाणार होतो. परंतु आचार्यांनी माझे घरी फोन करून मला दोन दिवस थांबविले. ओव्यांची वही ग. पां. परचुरे प्रकाशन मंदिराच्या हवाली केली. ती आज पुस्तक रूपाने रसिकांसमोर येत आहे.

माझ्या आईला काव्याचे देणे अंगचे होते. कथाकीर्तनादी श्रवणाने तिला बहुश्रुतपणा लाभला होता. अनुमान अंदाज हे अनुभव आणि अनुभूती झाले होते. ओव्या स्फुरताना शब्दांची किंवा यमकांची तिला कधीच वाण पडली नाही. यमके, श्लेष तिच्यासमोर पट्टेवाल्याप्रमाणे उभे राहात असत; कल्पना, उपमा दासीप्रमाणे जवळ धावत येत असत. तिचे निरीक्षण नि विनोदबुद्धी तल्लख होती. तिची ग्रहण-शक्ती आणि स्मरणशक्ती वाखाणण्यासारखी होती. माझ्या आईच्या काव्यासंबंधी आचार्य अत्रे यांनी प्रस्तावनेत स्वयंस्फूर्तीने सर्व काही लिहिले आहे. अगदी शीग ओसंडून माप दिले आहे. काव्याचा व्यवहार व व्यवहारातील काव्य त्यांनी डोळ्यांसमोर उभे करून जीवनसंगीताबरोबरच जीवनसंगतीही मोठ्या कौशल्याने दाखविली आहे. इतके हृद्य निवेदन तेच करू जाणत ! त्याबद्दल मी जास्त लिहीत नाही. व्यवहारातील तिचे साधे गद्य बोलणेही किती मार्मिक व काव्यपूर्ण असे याबद्दल मी थोडेसे लिहीत आहे.

आमच्या मळ्यात विहिरीमागे एक आंब्याचे झाड आहे. विहिरीच्या धावेवर एक गुलमोहराचे झाड होते. एकदा कुणीतरी तिला म्हणाले, ' गुलमोहराच्या झाडाचा काय उपयोग ? या झाडाला फळे नाहीत. ना पोट भरे ना ओठ भरे ! ' त्यावर आई म्हणाली, ' आंब्याने पोट भरत असेल. त्याच्या झाडाची सावली मिळत असेल. पण या गुलमोहराच्या झाडाने डोळ्यांना सुख मिळतं आणि मन भरतं.'

कापूसवेचणीच्या वेळी मी एकदा आईबरोबर शेतात गेलो होतो. कापसाचे एक बोंड हाती घेतले व त्याचा कापूस ( रुई ) बाजूला काढून सरकी हातावर घेतली. त्यावर आई म्हणाली, ' पाहा, देवानं सरकीला कसा पांढरा स्वच्छ पोशाख नेसवून पाठविलं. पण माणसाने तिला नागडी केली आणि तिचे वस्त्र तो आपण स्वतःच नेसू लागला. '

मी एकदा आईला म्हणालो, ' तू शेतात कष्टाची कामे करतेस, तुझी नजर जमिनीकडे आणि तुला हे सर्व विचार सुचतात तरी कसे ? ' त्यावर आईने उत्तर दिले, ' धरत्रीच्या आरशामधी मी सरग ( स्वर्ग ) पाहते बापा ! '

आधुनिकतेकडे तिचा कल होता. जुन्याबरोबर नव्याचेही ती स्वागत करीत असे. एक अत्यंत खुर्जा म्हातारी ( धुडाबोय ) आमचे वाड्यात असे. पोरे चिडवीत असता त्यांच्यामागे ती पळाली म्हणजे ' अरे, आगगाडीचं मोहोळ ( इंजिन ) आलं रे ! ' अशी यंत्रयुगातील उपमा ती देत असे. नवकवींनी ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे.

दर उन्हाळ्यात आई नाशिक येथे हवापालट म्हणून येत असे. जळगाव येथील शेतकरी स्त्रियांत ती जितकी विलीन होत असे तितकीच ती पांढरपेशांतही तल्लीन होत असे. खेडूत जीवन जगणाऱ्या व नागरी जीवन जगणाऱ्या स्त्रियांचे या निमित्ताने तिने बरेच निरीक्षण केलेले होते. एकदा सौ. लीलादेवीने तिला सहज विचारले, ' सासूबाई, तुम्ही खानदेशात वालाचे बिरडे, केळफुलाची भाजी का करीत नाही ? ' त्यावर ती म्हणाली, ' सूनबाई, शेतकरी बाया शेतीच्या कामानेच इतक्या बेजार होतात की त्यांना वेळ मिळत नाही. वेळ असता तर चिंचेच्या पानांच्या पत्रावळी करून त्यावरही त्या जेवल्या असत्या ! ' तिचे म्हणणे माझ्या पत्नीला पूर्णपणे पटले. त्याचबरोबर मनापासून हसूही आले. आई आजारी असल्याचे पत्र आले म्हणजे मी ताबडतोब जळगावला जात असे. तेथे गेलो म्हणजे एका दिवसातच तिला आराम वाटायचा ! मी एकदा म्हणालो, ' आई, मी तुला भेटायला आलो की तुझा आजार लगेच कसा नाहीसा होतो ? ' त्यावर ती म्हणाली, ' तू औषधासारखा येतोस ! ' गेल्या वर्षीच्या तिच्या दुखण्यात मात्र माझा औषधासारखा उपयोग झाला नाही. शेवटचे क्षण ती मोजीत होती. ३ डिसेंबर १९५१ रोजी माझी आई इहलोक सोडून गेली. सहज बोलण्यातील तिचे अनेक प्रसंग मला सांगता येतील. त्यातील थोडी वानगी रसिकांसमोर ठेवली. यापेक्षा जास्त लिहीत नाही.



' श्यामची आई ' चित्रपटाचे चित्रीकरण चालू असताना वेळात वेळ काढून आचार्य अत्रे यांनी माझ्या आईचीही कदर केली. तिचे यथार्थ काव्यदर्शन म्हणून सुंदर प्रस्तावना लिहून दिली. याबद्दल आचार्यांचे कसे आभार मानू ? त्यांच्या ऋणातच गुंतून राहावेसे वाटते. पुस्तकाच्या शेवटी शब्दार्थ दिले आहेत. त्यांपैकी काही शब्दांचे अर्थ व अर्थवाही खुलासे जळगाव येथील माझे पुतणे श्री. पितांबर चौधरी यांनी वेळेवर पाठविले, त्याचे आभार मानणेही परकेपणाचे होईल. ग. पां. परचुरे प्रकाशन मंदिराने मोठ्या आवडीने पुस्तक प्रकाशित केले याबद्दल त्यांचे हार्दिक आभार मानतो.

मुंबई
९ डिसेंबर १९५२

**सोपानदेव चौधरी**

## दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने
## निवेदन

'बहिणाईची गाणी' या कवितासंग्रहाची ही दुसरी आवृत्ती सहासात वर्षांपूर्वीच प्रसिद्ध व्हावयास हवी होती. परंतु तो योग आज आला याबद्दल अत्यंत समाधान वाटते. या कवितासंग्रहाची पहिली आवृत्ती सतरा वर्षांपूर्वी घाईघाईनेच प्रकाशित झाली. त्यानंतर माझ्या जन्मगावी जळगाव येथे चारपाच वेळा जाऊन आलो. त्या वर्षभरात आणखी ज्या काही ओव्या मिळणे शक्य होते त्या मिळाल्या. काही कविता व स्फुटे माझ्या जुन्या कागदपत्रात मिळाली. माझ्या मातोश्रींच्या काही उत्स्फूर्त अशा बऱ्याच म्हणी माझ्या स्मरणात होत्या. त्या व आणखी काही म्हणी मिळाल्या. या सर्व बाबतीत माझे मामा कै. धनाजी महाजन यांचे त्याचप्रमाणे काही स्वकीयांचे आणि जुन्या स्थानांचे व व्यक्तींचे संदर्भ सांगण्यात काव्यरत्नावलीचे वारस श्री. रामकृष्णपंत फडणीस यांचेही बरेच साहाय्य झाले. या सर्व अपुऱ्यासपुऱ्या कविता विशेषतः आचार्य अत्रे यांच्या साप्ताहिक 'नवयुग'त आणि इतर नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत. या गोष्टीलाही पंधरा-सोळा वर्षे होऊन गेली. या प्रसिद्ध झालेल्या कविता मराठी रसिकांना अत्यंत आवडल्याचे आढळून आले. 'अरे संसार संसार', 'मन वढाय वढाय' या कवितांबरोबरच 'अरे खोप्यामधी खोपा' या कविता तर सर्वतोमुखी झाल्या. 'अरे संसार संसार' या कवितेला मोठ्या मानाने फाळके पारितोषिक मिळाले. असो. नंतर मिळालेल्या या सर्व कविता या दुसऱ्या आवृत्तीत सामील केल्या आहेत. आता मात्र एकही ओवी मिळणे शक्य नाही. माझ्या मातोश्रींच्या बऱ्याच हृद्य अशा आठवणी तेवढ्या शिल्लक आहेत. तिने सांगितलेल्या काही रूपकात्मक तशाच



बोधपर गोष्टी 'अमृत' मासिकात प्रसिद्ध झालेल्या आहेत. काही माझ्या स्मरणात आहेत. हे सर्व हातून लिहिले गेले म्हणजे मी कृतार्थ झालो असे समजेन.

'बहिणाईची गाणी' या कविता-संग्रहाच्या पहिल्या आवृत्तीला आचार्य अत्रे यांनी स्वयंस्फूर्तीने, आत्मीयतेने प्रस्तावना लिहून दिली. 'तेथे अभिप्रायोचि अभिप्रायाते विये' अशीच ती प्रस्तावना 'कऱ्हेचे पाणी' या आपल्या अमर ग्रंथात समाविष्ट केली. तिला अढळ स्थान प्राप्त झाले असे मी मानतो. त्याच तोलामोलाची अधिकृत प्रस्तावना या दुसऱ्या आवृत्तीलाही आचार्य अत्रे यांनी दिली. मुळात हा कविता-संग्रह प्रसिद्ध करावयास दिलेली प्रेरणाही त्यांचीच. आत्मीयतेला आभार मानवत नाहीत. त्यांच्या ऋणात गुंतून राहण्यातच मला मोकळेपणा वाटतो.

**सोपानदेव चौधरी**

# निसर्गकन्या माझ्या बहिणाई

एकोणीसशे बावन्न साली बहिणाईंच्या कवितांची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली. त्याच वेळी माझा आणि त्यांचा एक अतूट मनबंध निर्माण झाला. त्यांनी मला काय दिले आणि मी त्यांच्यापासून काय घेतले हे सांगणे शब्दापलीकडचे आहे.

मी त्यांना पाहिले नाही. ज्या भूमीत त्या वाढल्या, राहिल्या तीही मी अद्याप पाहिलेली नाही. पण त्या माझ्या झाल्या खऱ्या. त्यांनीच म्हटले आहे ना, ' हिरिताचे देनं घेनं ' तशा प्रकारचे हे मनबंध असतील.

त्यांच्या कवितांची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाल्यानंतर एकोणीसशे सत्तरमध्ये त्यांच्या एकूण कवितांसह ' बहिणाईची गाणी ' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. आज ते माझ्या पुढ्यात आहे.

त्यांच्या कविता प्रसिद्ध झाल्यानंतर मान्यवर रसिकांनी, कवींनी, समीक्षकांनी त्यांना ' निसर्गकन्या ' म्हणून गौरविले. त्या निसर्गकन्या आहेतच; पण केवळ निसर्गकन्या नाहीत, त्या भूमिकन्या आहेत. सर्वार्थाने भूमिकन्या आहेत.

खानदेशातील ज्या काळ्याशार भूमीत त्या रसरशीत अंकुरासारख्या रुजल्या, वाढल्या त्या काळ्या आईनेच त्यांचे व्यक्तिमत्त्व घडवले. तिच्यासारखेच कणखर आणि मृदुसोशिक आणि क्षमाशील. अशा त्या व्यक्तिमत्त्वातूनच त्यांची गाणी निर्माण झाली. तीही त्याच व्यक्तिमत्त्वाचा गुण आणि गंध घेऊन. म्हणूनच काळी आई आणि बहिणाई, बहिणाई आणि बहिणाईंची गाणी ही अतूट आहेत. बहिणाईची गाणी म्हणजेच बहिणाई. आणि बहिणाई म्हणजेच बहिणाईची गाणी.

ज्या काळ्या आईवर त्यांनी अपार प्रेम केले, त्याच काळ्या आईच्या दुधावर जोपासलेल्या माणसांवरही त्यांनी प्रेम केले. बरे-वाईट, सुष्ट-दुष्ट, कुरूप-सुजी, सुजन, साधुपुरुष अशा सर्व तऱ्हेच्या माणसांबद्दल त्यांना आपुलकी वाटे. त्या माणसांनी निर्माण केलेल्या मंदिरावर, हवेलीवर, वाड्यावरही त्यांचा जीव जडला. धरित्रीवर तर त्यांचा अमाप जीव. तिच्या संगत राहण्यात त्यांना मनस्वी आनंद. तीच त्यांची आई, सखी, देवता. त्या धरित्रीच्या लेकरांवर बोरी-बाभळीवर, आंब्यावर, नदीवर, दगडागोट्यांवर इतकेच काय पण जनावरांवर, पाखरांवर त्यांनी जितकी माया केली तेवढी आजपर्यंत कुणी केली नसेल.

बहिणाई मोठ्या बुद्धिमान, चतुर आणि बहुश्रुत होत्या. त्यांच्या स्वभावाला विनोदाचीही झालर होती. सुखातील सुख वाढवणारी आणि दुःखातील कळ कमी करणारी. कधी कधी बोलता बोलता ऐकणाऱ्याला बरेच काही शिकवून जाणारी.

त्यांची प्रतिभा ही तर त्यांची दैवी देणगीच समजायला हवी. कारण तिच्या प्रभावाने मोठे मोठे लोक स्तिमित झाले आहेत. त्यांची काव्यशक्ती अतिशय जागरूक असायची. घरीदारी, कामात, विश्रांतीत, सुखात, दुःखात, संकटात, वैफल्यात, संसारात आणि निसर्गात जे जे त्यांनी अनुभवले त्यातील काव्य या त्यांच्या काव्यशक्तीने टिपून घेतले आणि त्यांच्या प्रतिभेने त्याला गाण्यांच्या रूपात एका वेगळ्याच उंच पातळीला नेऊन पोहोचविले.

त्यांनी संसारात जे जे सोसले त्यांचे त्यांच्या प्रतिभेने अश्रूंचे थेंब तयार केले. अश्रू सुखाचे, दुःखाचे, करुणेचे. त्यात दुःखाचा आक्रस्ताळेपणा नाही किंवा आनंदाचा कल्लोळ नाही किंवा दुष्टाव्याचा द्वेष नाही, तर केवळ करुणा. अशा स्फटिकासारख्या तीन छटांच्या झळाळी असलेले अश्रू.

जमिनीत मशागत करताना, पाखरांवर, जनावरांवर माया करताना, पाऊस-पाण्याने हरखून जाताना त्यांच्या प्रतिभेने जे टिपले ते ज्वारीच्या कसदार दाण्यातील दुधाचे थेंब. तितकेच गोड आणि रसरशीत, भुलवणारे, स्तिमित करणारे.

घरकामात, शेतकामात वावरताना जे जे अनुभव त्यांना आले त्यांचे त्यांनी चिंतन केले. त्या चिंतनातून त्यांच्या प्रतिभेने बनवले दवाचे थेंब. अगदी नितळ. ज्यात अजूनही निरखून पाहावे असे वाटणारे, माणुसकीचे दर्शन घडवणारे. निसर्गात परमेश्वराला पाहायला लावणारे सदा सतेज आणि सदा प्रसन्न असे.

बहिणाईची गाणी म्हणजे हा असा जडावाचा तीनपदरी हार आहे.

कवितेचे पुस्तक वाचताना पार्श्वसंगीतासारखी माझ्या मनात एक कल्पना नेहमी उभी असते. ती अशी. आपण झुळझुळ वाहणाऱ्या निर्मळ प्रवाहाच्या

काठाशी बसलो आहोत. आणि तळातील रंगीबेरंगी रेती, दगडगोटे आणि प्रवाहाचे तरंग यांत अगदी गुंतून जात आहोत.

बहिणाईंच्या गाण्यांचे पुस्तक वाचताना निराळेच वाटले. वाटले की, त्या निर्मळ प्रवाहात आपण त्या प्रवाहाच्या लहरी सांभाळत एखाद्या फुलमाळेसारख्या वहात चाललो आहोत.

असे वाहता वाहताच मी बहिणाईंच्या माहेरी जाऊन पोहोचते.

' रात दिन गजबज
    असं खटल्याचं घर
सदा आबादी आबाद
    माझं असोदं माहेर

गावामधी दबदबा
    बाप महाजन माझा
त्याचा काटेतोल न्याय
    असा गावामधी राजा '

असे घर, असे वडील आणि आई भीमाई तर कशी.

' माय भीमाई माऊली
    जशी आंब्याची सावली
आम्हाइले केलं गार
    सोता उन्हांत तावली '

अशा या आईबापांच्या पोटी तीन भाऊ आणि चार बहिणी.

' आम्ही बहीनी आह्मला
    सीता तुळसा बहीना
देल्या अशीलाचे घरी
    सगेसाई मोती दाना '



अशा भरलेल्या माहेरातून बहिणाई सासरी आल्या. सासरी घरात सासू, नणंद, मोठा दीर, जाऊ, चुलतसासू, घरधनी असे भरलेले सासर. त्यातल्या सासूचे आणि जावेचे वर्णन बहिणाईंनी केले आहे :

' खटल्याच्या घरामधी
    देखा माझी सग्गी सासू
सदा पोटामधी माया
    तसे डोयामध्ये आसू '

अशी ' देवगाईच्या ' स्वभावाची सासू आणि जाऊ तर

' बोले तोंड भरोसनी
    तसं हात भरी देनं
काम अंग मोडीसनी
    सैपाकात सुगडीन '

अशा या सासरी त्यांचे दिवस गेले. तरी पण ते सासरच. त्याला माहेराचा मोकळेपणा कुठला! आणि त्यात शेतीचा व्यवसाय, ज्याचा त्याच्या घरच्या बायकांना कष्ट कसे चुकतील?

भल्या पहाटे उठून दळण घालायचे. दळण संपले की डोक्यावर घडा घेऊन पाण्याला जायचे. पाणी भरून होईपर्यंत सूर्य उगवेल. मग सैपाकाला चुल्हा पेटवायचा. पुढचे सर्व त्यांच्याच शब्दात वाचायला हवे :

' ऊठ सासुरवाशिनबाई
ऊठ जानं शेतीकामाचा किती घोर
तू गोठ्यामधलं ढोर

    ऊठ सासुरवाशिनबाई
    सुरू झाली वटवट, कातावली वो सासू
    पूस डोयामधले आसू

ऊठ सासुरवाशिनबाई
घे सोशीसन घे, घालू नको वाद
कर माहेराची याद '

त्या काळातील सासुरवाशिणीचे हे चित्र मन अस्वस्थ करून टाकते.

अशा निरनिराळ्या ताणात असणाऱ्या सासुरवाशिणींना सणासुदीला जरा मोकळेपणा. खेळ, टिपऱ्या, फुगडी, झोका यात रमण्याचा तो दिवस. हा मनाचा मुक्तपणा तितक्याच मुक्तपणे ' आखजी ' या गाण्यात प्रकट झाला आहे.

' माझा झोका माझा झोका
चालला भिरी भिरी जी
माझा झोका माझा झोका
खेयतो वाऱ्यावरी जी
गेला झोका गेला झोका
चालला माहेराले जी
आला झोका आला झोका
पलट सासराले जी '

सगळे खेळ खेळून हातपाय आंबून जातात. तरी मुली एकमेकीला विचारतात

' सन सरे सन सरे
आखजी गेली व्हयी जी
सांग सई सांग सई
आखजी आता कही जी '

पुन्हा इतका मोकळेपणा मिळायला पुढच्या अक्षयतृतीयेची वाट पाहायची.

सासरी कष्ट करताना नेहमीच माहेराची आठवण येते. माहेरावरून रचलेली गाणी शेतीकाम करताना मोठ्याने मुक्त स्वरात गावीशी वाटतात. त्या गाण्यांच्या आवाजाने त्रासलेला एक योगी गाणारणीला विचारतो—



' काय ग अशी सारखी माहेर माहेर करतेस, गाणी गातेस, तर मग तू सासरी आलीस तरी कशाला ? '

या प्रश्नाला बहिणाईंनी जे गाण्यातच उत्तर दिले आहे तितके चांगले काव्य मी अजून दुसरे वाचले नाही. त्या म्हणतात :

' अरे लागले डोहाये
सांगे शेतातली माटी
गाते माहेराचं गानं
लेक येई, येईन रे पोटी

दे रे तू योग्या ध्यान
ऐक काय मी सांगते
लेकीच्या माहेरासाठी
माय सासरी नांदते '

घरकाम करायचे, शेतात कष्ट करायचे, फावल्या वेळात राममंदिरात जायचे, कीर्तन ऐकायचे अशा बहिणाईंच्या जीवनात त्यांच्या वयाच्या तिसाव्या वर्षी भयंकर मोठा आघात झाला. त्यांची लहान दोन मुले पोरकी झाली आणि बहिणाईंनी दुःख बाजूला ठेवून कंबर बांधली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील कणखरपणा प्रकट झाला. त्या प्रसंगावरील गाण्यात त्या म्हणतात :

' लपे करमाची रेखा
माझ्या कुंकवाच्या खाली
पुशीसनी गेलं कुंकू
रेखा उघडी पडली
अरे नशीब नशीब
लागे चक्कर पायाले
नशीबाचे नऊ गिऱ्हे
ते भी फिरत राहिले

रडू नको माझ्या जीवा
तुले रडाची रे सव
रडू हासव रे जरा
त्यात संसाराची चव
जरी फुटल्या बांगड्या
मनगटी करतूत
तुटे मंगयसूतर
उरे गयाची शपथ '

आणि या करतूतातूनच त्या पुढचे जीवन जगल्या. हातापायावर चरे पडेपर्यंत मळ्यातील कामे करायची. बरे-वाईट अनुभव सोसायचे. सारे एकट्याने करायचे. मनाला धीर द्यायचा.

' नशीबी दगड गोटे
काटयाकुटयाचा धनी
पायाला लागे ठेचा
आले डोयाले पानी
माझेच भाऊबंद
घाईसनी येतीन
नको करू रे आशा
धर एवढं ध्यान
तुझ्याच पायाने जानं
तुझा तुला रे जीव
लावनी पार आता
तुझी तुलेच नाव '

आणखी त्या म्हणतात. मनाला धीर देतात.



' हास हास माझ्या जीवा
असा संसारात हास
इडा पीडा संकटाच्या
तोंडावऱ्हे काय फास
जग जग माझ्या जीवा
असं जगनं तोलाचं
उच्च गगनासारखं
धरत्रीच्या रे मोलाचं '

आता शेती हेच त्यांचे सर्वस्व बनले. शेतीची साधने, शेतीची मशागत आणि त्यातील प्रक्रिया या सर्व त्यांनी काव्यात गुंफल्या आहेत. पाऊस आला की त्या म्हणतात.

' आता उगू दे रे शेत
आला पाऊस पाऊस
वऱ्हे येऊ दे रे रोप
आता फिटली हाऊस
देवा पाऊस पाऊस
तुझ्या डोयातले आस
देवा तुझा रे हारास
जीवा तुझी रे मिरास '

पाऊस आल्यानंतर पेरणीची गडबड तरी किती !

' पेरनी पेरनी
काढा पांभरी मोघडा
झडीनं तो झडो
कव्हा बर्साती चौघडा '

आणि या पेरणीनंतर जमिनीतून आलेली रोपे पाहून बहिणाईंनी जो आनंद व्यक्त केला आहे त्याला मराठी कवितेत तोड नाही. ती सर्व कविताच वाचली पाहिजे. 'देव अजब गारोडी'

'ऊन वाऱ्याशी खेयता
एका एका कोंबातून
पर्गटले दोन पान
जसे हात जोडीसन
टाळ्या वाजवती पानं
दंग देवाच्या भजनी
जसे करती करोन्या
होऊ दे रे आबादानी
दिसा मासा व्हये वाढ
रोपं झाली आता मोठी
आला पिकाले बहर
झाली शेतामधी दाटी'

आणि मग मळणीच्या वेळी त्यांना उपननीची कोण घाई!

'आता चाल चाल बैला
पुढे आली उपननी
वारा चालला रे वाया
कसा ठेऊ मी धरूनी'

असे त्या बैलाला विचारतात. आणि उपननीच्या वेळी वारा सुटल्यावर बहिणाईंना काय आनंद होतो!

'भिन भिन आला वारा
कोन कोनाशी बोलली
मन माझं हरखलं
पानं झाडाची हालली
वारा आला रे झन्नाट्या
झाडं झुडुपं डोलली
धरा मदनाच्या पाट्या
खाले पोखरी चालली'

आता त्यांचे मळ्यातील मोटेचे वर्णन पाहा.

'वसांडली मोट
करे धो धो थायन्यात
हुंदडत पानी
जसं तान्हं पायन्यात'

आणि कपाशी तरी कशी वेचायची! बहिणाई म्हणतात :

'उठा उठा बहिनाबाई
बोंड कपाशीचे वेचा
बोटं हालवा हालवा
जशा पाखरांच्या चोचा'

रानावनातून रमणाऱ्या कवयित्रीच्या नजरेतून सुगरणीचे घरटे कसे सुटेल? फार सुंदर गाणे त्यांनी केले आहे.

'पिलं निजले खोप्यात
जसा झुलता बंगला
तिचा पिलामधी जीव
जीव झाडाले टांगला'

पण अशा सुगरणीचे पतिराज कसे?

' सुगरीन सुगरीन
अशी माझी रे चतर
तिले जन्माचा सांगाती
मिये गन्यागंप्या नर '

कारण तो तिला काहीच मदत करत नाही. या खोप्याच्या निमित्ताने त्यांनी माणसाला सांगितले आहे :

' खोपा इयला इयला
जसा गिलक्याचा कोसा
पाखराची कारागिरी
जरा देख रे मानसा
तिची उलूशीच चोच
तेच दात तेच ओठ
तुले दिले रे देवानं
दोन हात दहा बोटं '

शेतीची कामे करता करता बहिणाईंच्या डोळ्यापुढे माहेराची वाट दिसू लागते. माहेराची वाट सर्व स्त्रियांच्या माहेरच्या वाटेप्रमाणे मखमलीची आहे; पण वेगळेपणा पुढेच आहे.

त्या वाटेवर लौकी ही छोटी नदी आहे. वाटेवर पानांचे मळे आहेत. रेल्वेचे फाटक आहे. बाभळीचे बन आहे. पायाखालची माती तर पिवळी पिवळी अशी चिक्कण माती आहे.

' माझ्या माहेराच्या वाटे
डावा पान्याच्या लागल्या
म्हशी बसल्या पान्यात
जशा वरमाई न्हाल्या '



जाता जाता वाटेवर बहिणाईंच्या पायाला दगडाची ठेच लागली तर तो म्हणतो,

' नीट जाय मायबाई
नको करू धडपड
तुझ्याच मी माहेराच्या
वाटेवरचा दगड '

बहिणाईंना माहेरचा निरोप कसा येतो ?

' माहेरून दे निरोप
कानामंदी सांगे वारा
माझ्या माहेराच्या खेपा
लौकी नदीला विचारा '

आणि लेक येत आहे म्हणून माहेरी निरोप देणारी साळुंकी

' माझ्या माहेराच्या वाटे
मारे सायंकी भरारी
माझ्या जायाच्याच आधी
सांगे निरोप माहेरी '

माहेरचा ओढा स्त्रियांना असतोच. पण बहिणाईंना माहेराहूनही आपली कर्मभूमी आपली काळी आई धरित्री अधिक प्रिय आहे. बहिणाईंचे ' धरित्रीला दंडवत ' हे गाणे तर धरित्रीचे स्तोत्रच आहे.

' अशी धरित्रीची माया
अरे तिला नाही सीमा
दुनियेचं सर्व पोट
तिच्यामधे झाले जमा '

अशा या धरित्रीला दंडवत घालणे हे त्यांच्या रक्तातच आहे.

‘ शेतामधी भाऊराया
खाले वाकला वाकला
त्यानं आपल्या कपायी
टिया मातीचा लावला ’

बहिणाईंची धरित्री ही जशी देवता आहे तशीच ती त्यांची सखीही आहे. पति-निधनानंतरच्या मनःस्थितीत आयाबाया सांत्वनाला येत त्यांना त्या सांगतात.

‘ नका नका आयाबाया
नका करू माझी कींव ’

पण धरित्रीला अगदी हंबरून विचारतात :

‘ सांग सांग धर्तीमाता
अशी कशी जादू झाली
झाड गेलं निंघीसनी
मागे सावली उरली ’

संसारात आणि शेतात राबताना त्यांना किती बरे-वाईट अनुभव आले असतील! पण बहिणाई विचारी होत्या. त्यांनी काही विचार मनात पक्के केले होते. शिक्षणशास्त्रात असे एक मत आहे की, नागरिकशास्त्र हे शिकवायचे नसते. ते आचरणात आणायचे असते. अध्यात्म किंवा मानवधर्म यांचेही असेच आहे. खूप ग्रंथ वाचले, गुरू केले, प्रवचने ऐकली म्हणजे अध्यात्म प्राप्त होते असे नाही. त्याची माहिती होते. खरे अध्यात्म तनामनात मुरावे लागते. मानवधर्म व संसारचे अंतिम तत्त्व बहिणाईंच्या वागण्यातच प्रकट होत होते.

प्रथम सर्वाला मूळ कारण असे जे मन त्याच्या सामर्थ्याची आणि दुबळेपणाची पूर्ण जाणीव त्यांना होती. मन हे कसे ? त्या म्हणतात :

‘ मन मोकाट मोकाट
त्याले ठाई ठाई वाटा
जशा वाऱ्यानं चालल्या
पान्यावऱ्हल्या रे लाटा



मन जह्यरी जह्यरी
याचं नाव रे तंतर
अरे इच्चु साप बरा
त्याले उतारा मंतर ’

आणि शेवटी त्या चार अद्‌भुत ओळी लिहून जातात.

‘ देवा असं कसं मन
असं कसं रे घडलं
कुठे जागेपनी तुला
असं सपन पडलं ’

कितीही संकटे आली तरी त्या डगमगल्या नाहीत. कारण संसाराची मूळ धारणा ही

‘ बरा संसार संसार
जसा तवा चुल्ह्यावर
आधी हाताले चटके
तव्हा मियते भाकर ’

ही सर्वच कविता वाचून रत्नासारखी मनात जतन करून ठेवण्यासारखी आहे. असा संसार उपसताना एक लक्षात ठेवायचे.

‘ ये रे ये रे माझ्या जीवा
काम पडलं अमाप
काम करता करता
देख देवाजीचे रूप
ऐक ऐक माझ्या जीवा
पीडायेलाचं कन्हनं
दे रे गांजल्याले हात
त्याचं ऐक रे म्हननं ’

मळ्याला जाताना वाटेत महारवाडा लागतो. त्या कळवळतात. म्हणतात :

' देखा महारवाड्यात
नावाचेच घरदार
भटकती गावामधी
चाले तोंडाने जोहार
देखा महारवाड्यात
कशी मानसाची दैना
पोटामधी उठे आग
चुल्हा पेटता पेटेना '

त्याच वाटेवर दारूचा गुत्ताही लागतो. पण बहिणाईंची त्याकडे पाहण्याची दृष्टी वेगळी, करुणामय.

' काम करीसनी भागे
संकटानं गांजे कोनी
दूख इसाऱ्याच्या साठी
करती हे निशापानी '

त्या देवालाही मानतात. दागिन्यासाठी रुसणाऱ्या कानोड या देवतेपेक्षा भक्तासाठी कष्ट करणारा, जनाईला दळू लागणारा, पांडुरंग त्यांना अधिक आवडतो, श्रेष्ठ वाटतो. दिंडीमध्ये त्या दंग होतात. कथा-कीर्तनात त्या कीर्तन संपले तरी तल्लीन होऊन उभ्या राहतात. पण परमेश्वराची त्यांची स्वतःची कल्पना मात्र वेगळीच आहे. अतिसुंदर आहे.

' देव कुठे ' या गाण्यात त्या म्हणतात :

' सदा जगाच्या कारनी
चंदनापरी घासला
अरे सातामधे त्याले
देव दिसला दिसला



डोये मिटले मिटले
सोतालेबी विसरला
अरे अंधारात त्याले
देव दिसला दिसला
देव कुठे देव कुठे
तुझ्या बबुयामाझार
देव कुठे देव कुठे
आभायाच्या आरपार '

पण त्या देवाचे दर्शन त्यांना सततच होत असते.

' माझ्यासाठी पांडुरंगा
तुझं गीता-भागवत
पावसात समावत
माटीमधी उगवत
तुझ्या पायाची चाहूल
लागे पानापानामधी
देवा तुझं येनं जानं
वारा सांगे कानामधी '

ज्या ज्या व्यक्तीत त्यांना मानवधर्म आढळला त्या त्या व्यक्तींना त्यांनी आपल्या काव्यात गोवले. मुंजामुलासाठी आपण सर्पदंश करून घेणारे जयरामबुवा, गावाचा खोकला काढून घेऊन आपण सतत खोकत बसणारी खोकली माय, लोकांचे मनरंजन करणारा रायरंग, ही वानगी त्याची साक्ष देते.

अशी ही भान विसरायला लावणारी बहिणाईंची कविता. ही बहिणाईंनी शेतात कामे करताना, घरात घरोट्यावर दळताना गायिलेली. त्यासाठी त्यांची ' घरोट ' ही कविता वाचायलाच हवी.

' अरे घरोटा घरोटा
माझे दुखता रे हात
तसं संसाराचं गान
माझं बसते मी गात
अरे घरोटा घरोटा
दळताना पडे पिठी
तसं माझं गानं
पोटातून येते ओठी '

बहिणाई भावकवितेची व्याख्या किती सहज सहज सांगून गेल्या आहेत.

प्रत्येक गाण्यात प्रतिमांची मांडणी, त्यांची चढती योजना, यमके आणि अनुप्रास, साधेपणा, सुंदरपणा हे सर्व काव्याचे गुण फुलातून सुगंध यावा त्याप्रमाणे दरवळत राहतात. आपोआपच आपल्याला प्रतीत होतात.

ही गाणी बहिणाईंच्याकडून कधीमधी सुट्टीत घरी येणाऱ्या त्यांच्या चिरंजीवांनी म्हणजे श्री. सोपानदेव चौधरी यांनी वहीवर उतरून घेतली. जतन करून ठेवली.

एकदा श्री. प्र. के. अत्रे यांनी ती वाचली आणि ते म्हणाले,

' अरे हे बावनकशी सोने आहे. ही गाणी प्रसिद्ध झालीच पाहिजेत. ' आणि हे साहित्यधन आपल्याला लाभले.

पण हे नुसते पेटीत पडून राहणारे धन नाही. प्रकाश देणारे आहे. आजच्या जगात बहिणाईंची ही हाक फार विदीर्ण करणारी आहे

' मानूस मानूस
मतलबी रे मानसा
तुले फार हाव
तुझी हाकाकेल आशा
मानसा मानसा
तुझी नियत बेकार
तुझ्याहून बरं
गोठ्यातील जनावर '



आणि शेवटी त्या म्हणतात,

' मानसा मानसा
कधी व्हशील मानूस
लोभासाठी झाला
मानसाचा रे कानूस '

ही कविता वाचली, तिचे मनन केले की मन विषण्ण होते. पुढे काही बोलावे, लिहावे असे वाटतच नाही.

' नराचा नारायण बाजूला राहो ' माणसाचा माणूस कधी होईल ?

प्रसिद्धी – लोकसत्ता
३ डिसेंबर १९७६
बहिणाईंच्या पंचविसाव्या पुण्यतिथीनिमित्त.

**इंदिरा संत**

## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | बेडीमाय ( आदिमाया ) | १ |
| २ | माझी माय सरसोती | ३ |
| ३ | माहेर | ५ |
| ४ | माहेराची वाट | ७ |
| ५ | कशाले काय म्हनू नही | ११ |
| ६ | संसार | १३ |
| ७ | माझ्या जीवा | १५ |
| ८ | घरोट | १७ |
| ९ | मन | २० |
| १० | हिरीताचं देनं घेनं | २२ |
| ११ | लपे करमाची रेखा | २३ |
| १२ | आता माझा माले जीव | २५ |
| १३ | वाटच्या वाटसरा | २७ |
| १४ | शेतीची साधने | २९ |
| १५ | आला पाऊस | ३० |
| १६ | पेरनी | ३२ |
| १७ | देव अजब गारोडी | ३४ |
| १८ | कापनी | ३६ |
| १९ | रगडनी | ३८ |
| २० | उपननी | ४० |
| २१ | मोट हाकलतो एक | ४२ |
| २२ | खोप्यामधी खोपा | ४३ |
| २३ | गाडी जोडी | ४४ |

२४ गुढी उभारनी ४६
२५ आखजी ४८
२६ सासुरवाशीन ५१
२७ योगी आणि सासुरवाशीण ५२
२८ पोया ५४
२९ घरापासून मळ्याकडे ५७
३० गोसाई ६३
३१ जयराम बुवाचा मान ६६
३२ खोकली माय ७१
३३ अनागोंदी कारभार ७४
३४ नही दिंयामधी तेल ७५
३५ काय घडे आवगत ७६
३६ आप्पा महाराज ७९
३७ माझी मुक्ताई ८२
३८ आली पंढरीची दिंडी ८४
३९ विठ्ठल मंदिर ८६
४० खरा देवामधी देव ८८
४१ देव दिसला, देव कुठे ९०
४२ मानूस ९१
४३ रायरंग ९२
४४ पिलोक ९४
४५ चुल्हा पेटता पेटेना ! ९५
४६ मी कोन ? ९७
४७ स्फुट ओव्या ९९
४८ काही व्यक्तिचित्रे १११
४९ धरत्रीले दंडवत १२३
५० म्हणी १२५
शब्दकोश १२८

## येडीमाय ( आदिमाया )

आशी कशी येळी वो माये, आशी कशी येळी ?

बारा गाडे काजळ कुंकू
पुरलं नही लेनं
साती समदूराचं पानी
झालं नही न्हानं
आशी कशी येळी वो माये, आशी कशी येळी ?

धरतीवरलं चांदी सोनं
डागीन्याची तूट
आभायाचं चोयी लुगडं
तेभी झालं थिटं
आशी कशी येळी वो माये, आशी कशी येळी ?

इडा पिडा संकटाले
देल्हा तूने टाया
झाल्या तुझ्या गयामंधी
नरोंडाच्या माया
आशी कशी येळी वो माये, अशी कशी येळी ?

बरह्मा इस्नू रुद्र बाळ
खेळईले वटी
कोम्हायता फुटे पान्हा
गानं आलं व्होटी
आशी कशी येळी वो माये, आशी कशी येळी ?

नशीबाचे नऊ गिऱ्हे
काय तुझ्या लेखी ?
गिऱ्ह्यानाले खाईसनी
कशी झाली सुखी ?
आशी कशी येळी वो माये, आशी कशी येळी ?

नऊ ग्रनासी खाउन गेली
सहज एक्या गोष्टी
दहाऱ्याशी खाशीन तऱ्हा
कुठे राहिन सुष्टी
आशी कशी येळी वो माये, आशी कशी येळी ?



## माझी माय सरसोती

माझी माय सरसोती
माले शिकवते बोली
लेक बहिनाच्या, मनी
किती गुपीतं पेरली !

माझ्यासाठी पांडुरंगा
तुझं गीता-भागवत
पावसात समावतं
माटीमधी उगवतं !

अरे देवाचं दर्सन
झालं झालं आपसुक
हिरिदात सूर्यबापा
दाये अरूपाचं रूप !

तुझ्या पायाची चाहूल
लागे पानापानांमधी
देवा तुझं येनंजानं
वारा सांगे कानामधी.

फुलामधी समावला
धरत्रीचा परमय
माझ्या नाकाले इचारा
नथनीले त्याचं काय ?


Modern College, Pune-5

किती रंगवशी रंग
रंग भरले डोयात
माझ्यासाठी शिरिरंग
रंग खेये आभायात.

धर्ती मधल्या रसानं
जीभ माझी सवादते
तव्हा तोंडातली चव
पिंडामधी ठाव घेते.



## माहेर

बापाजीच्या हायलीत
येती शेट शेतकरी
दारी खेटराची रास
घरी भरली कचेरी

गावामधी दबदबा
बाप महाजन माझा
त्याचा काटेतोल न्याव
जसा गावामधी राजा

माय भीमाई माउली
जशी आंब्याची साउली
आम्हाईले केलं गार
सोता उन्हात तावली

तुझे भाऊ देवा घरी
नही मायबाप तुले
तुले कशाचं माहेर
लागे कुलूप दाराले

भाऊ 'घमा' गाये घाम
'गना' भगत गनात
'घना' माझा लिखनार
गेला शिक्याले धुयात

आम्ही बहीनी ' आह्यला '
' सीता, तुयसा, बहीना
देल्या आशीलाचे घरी
सगेसाई मोतीदाना

लागे पायाला चटके
रस्ता तापीसनी लाल
माझ्या माहेराची वाट
माले वाटे मखमल

जीव व्हतो लाही लाही
चैत्र वैसागाचं ऊन
पाय पडता ' लौकीत '
शीन जातो निंघीसन

तापीवानी नही थडी
जरी वाहे थोडी थोडी
पानी ' लौकी 'चं नित्तय
त्याले अम्रीताची गोडी

माहेरून ये निरोप
सांगे कानामंधी वारा
माझ्या माहेराच्या खेपा
' लौकी' नदीले इचारा !



## माहेराची वाट

आज माहेराले जानं
झाली झाली वो पहाट
आली आली डोयापुढे
माझ्या माहेराची वाट

रातदीन गजबज
असं खटल्याचं घर
सदा आबादीआबाद
माझं आसोद माहेर

माझ्या माहेराच्या वाटे
तांडे पानाचे लागले
पानं कतरतो बारी
लागे बारीन येच्याले

माझ्या माहेराच्या वाटे
रेलबाईचं फाटुक
आगगाडीचं येनंजानं
तिले कशाची आटक ?

माझ्या माहेराच्या वाटे
लौकी लागली लागली
वाटच्या रे वाटसरा
तुझी तहान भागली

माझ्या माहेराच्या वाटे
पिव्ळी चिकनास खारी
पानी पावसाया आंधी
जाते धाव्याधाव्यावरी

माझ्या माहेराच्या वाटे
देखा बाभयींचं बन
चुल्हा लहाडीच्यासाठी
घराघरात बैतन

माझ्या माहेराच्या वाटे
डाबा पान्याच्या लागल्या
म्हशी बसल्या पान्यात
जशा वरमाई न्हाल्या.

माझ्या माहेराच्या वाटे
देख मये चारोमेरी
गाड्या ऊसाच्या चालल्या
बुधवारच्या बाजारी

माझ्या माहेराच्या वाटे
घंट्या घुंगराचा नाद
येती जाती बैलगाड्या
धुरकरी घाले साद

मांघे पोत्यातून गये
गव्हा-जवारीची धार



पाखराचा जमे बेत
दाने खाई झाले गार.

माझ्या माहेराच्या वाटे
गायी म्हशीचं खिल्लार
गावामधी बरकत
दह्या दुधाची रे ढेर !

माझ्या माहेराच्या वाटे
कोन्ही भिकारी-टकारी
आला भीक मांगीसनी
झोयी गेली सम्दी भरी

माझ्या माहेराच्या वाटे
कोन्ही भिलीन बायजा
खाले उतारली पाटी
म्हने कटेलं लेयजा.

*　　*　　*

माझ्या माहेराच्या वाटे
जरी आले पायी फोड
पाय चालले चालले
अशी माहेराची ओढ.

माझ्या माहेराच्या वाटे
जरी लागल्या रे ठेचा
वाटवरच्या दगडा
तुले फुटली रे वाचा !

“ नीट जाय मायबाई
नको करू धडपड
तुझ्याच मी माहेराच्या
वाटवरला दगड ! ”

माझ्या माहेराच्या वाटे
माले लागली गुचकी
आली उडत उडत
एक दीसली सायंकी.

माझ्या माहेराच्या वाटे
मारे सायंकी भरारी
माझ्या जायाच्याच आधी
सांगे निरोप माहेरी

“ ऊठ ऊठ भीमामाय
काय घरात बसली
कर गुरमय रोट्या
लेक बहिनाई आली ! ”



## कशाले काय म्हनू नही

बिना कपाशीनं उले
त्याले बोंड म्हनू नही
हरी नामाईना बोले
त्याले तोंड म्हनू नही

नही वाऱ्यानं हालल
त्याले पान म्हनू नही
नही ऐके हरीनाम
त्याले कान म्हनू नही

पाटा येहेरीवाचून
त्याले मया म्हनू नही
नही देवाचं दर्सन
त्याले डोया म्हनू नही

निजवते भुक्या पोटी
तिले रात म्हनू नही
आखडला दानासाठी
त्याले हात म्हनू नही

ज्याच्या मधी नही पानी
त्याले हाय म्हनू नही
धावा ऐकून आडला
त्याले पाय म्हनू नही

येहेरीतून ये रीती
तिले मोट म्हनू नही
केली सोताची भरती
त्याले पोट म्हनू नही

नही वळखला कान्हा
तिले गाय म्हनू नही
जीले नही फुटे पान्हा
तिले माय म्हनू नही.

अरे, वाटच्या दोरीले
कधी साप म्हनू नही
इके पोटच्या पोरीले
त्याले बाप म्हनू नही.

दुधावर आली बुरी
तिले साय म्हनू नही
जिची माया गेली सरी
तिले माय म्हनू नही

इमानाले इसरेला
त्याले नेक म्हनू नही
जल्मदात्याले भोवला
त्याले लेक म्हनू नही.

ज्याच्यामधी नही भाव
त्याले भक्ती म्हनू नही
ज्याच्यामधी नही चेव
त्याले शक्ती म्हनू नही.



## संसार

अरे संसार संसार
जसा तावा चुल्ह्यावर
आधी हाताले चटके
तव्हा मियते भाकर !

अरे संसार संसार
खोटा कधी म्हनू नही
राऊळाच्या कयसाले
लोटा कधी म्हनू नही

अरे, संसार संसार
नही रडनं कुढनं
येड्या, गयातला हार
म्हनू नको रे लोढनं !

अरे, संसार संसार
खीरा येलावरचा तोड
एक तोंडा मधी कडू
बाकी अवघा लागे गोड

अरे, संसार संसार
म्हनू नको रे भीलावा
त्याले गोड भीमफूलं
मधी गोंडब्याचा ठेवा

देखा संसार संसार
शेंग वरतून काटे
अरे, वरतून काटे
मधी चिक्ने सागरगोटे !

ऐका, संसार संसार
दोन्ही जीवाचा इचार
देतो दु:खाले होकार
अन् सुखाले नकार

देखा, संसार संसार
दोन्ही जीवाचा सुधार
कधी नगद उधार
सुखादु:खाचा बेपार !

अरे, संसार संसार
असा मोठा जादूगार
माझ्या जीवाचा मंतर
त्याच्यावरती मदार

असा संसार संसार
आधी देवाचा ईसार
माझ्या दैवाचा जोजार
मंग जीवाचा आधार !



## माझ्या जीवा

जीव देवानं धाडला
जल्म म्हने 'आला आला'
जव्हा आलं बोलावनं
मौत म्हने 'गेला गेला'

दीस आला कामामधी
रात नीजमधी गेली
मरनाची नीज जाता
जलमाची जाग आली

नही सरलं सरलं
जीवा तुझं येनं जानं
जसा घडला मुक्काम
त्याले म्हनती रे जीनं

आला सास, गेला सास
जीवा तुझं रे तंतर
अरे जगनं–मरनं
एका सासाचं अंतर !

येरे येरे माझ्या जीवा
काम पडलं अमाप
काम करता करता
देख देवाजीचं रूप

ऐक ऐक माझ्या जीवा
पीडायेलाचं कन्हनं !
देरे गांजल्याले हात
त्याचं ऐक रे म्हननं

अरे निमानतोंड्याच्या
वढ पाठीवऱ्हे धांडा
नाच नाच माझ्या जीवा
संसाराचा झालझेंडा

हास हास माझ्या जीवा
असा संसारात हास
इडा पीडा संकटाच्या
तोंडावऱ्हे कायं फास

जग जग माझ्या जीवा
असं जगनं तोलाचं
उच्च गगनासारखं
धरत्रीच्या रे मोलाचं



## घरोट (जाते)

देवा, घरोट घरोट
तुझ्या मनातली गोट
सर्व्या दुनियेचं पोट
घरी कर्माचा मरोट

अरे, घरोट घरोट
वानी बाम्हनाचं ' जातं '
कसा घरघर वाजे
त्याले म्हनवा घरोट

अरे जोडता तोडलं
त्याले नातं म्हनू नही
ज्याच्यातून येतं पीठ
त्याले जातं म्हनू नही

कसा घरोट घरोट
माझा वाजे घरघर
घरघरीतून त्याच्या
माले ऐकू येतो सूर

त्यात आहे घरघर
येड्या, आपल्या घराची
अरे, आहे घरघर
त्यात भर्ल्या आभायाची !

आता घरोटा घरोटा
        दयन मांडलं नीट
अरे, धंद्या-भरामधी
        कर त्याचं आता पीठ

चाल घरोटा घरोटा
        तुझी चाले घरघर
तुझ्या घरघरीतून
        पीठ गये भरभर

जशी तुझी रे घरोटा
        पाऊ फिरे गरगर
तसं दुधावानी पीठ
        पडतं रे भुईवर

अरे, घरोटा घरोटा
        तुझ्या माकनीची आस
माझ्या एका हाती खूटा
        दुज्या हाती देते घास.

अरे, घरोटा घरोटा
        घास माझा जवारीचा
तुले सनासुदी गहू
        कधी देते बाजरीचा.

माझा घरोट घरोट
        दोन दाढा दोन व्होट



दाने खाये मूठ मूठ
        त्याच्यातून गये पीठ

अरे, घरोटा घरोटा
        माझे दुखता रे हात
तसं संसाराचं गानं
        माझं बसते मी गात

अरे, घरोटा घरोटा
        तुझ्यातून पडे पीठी
तसं तसं माझं गानं
        पोटातून येतं व्होटी

दाने दयता दयता
        जशी घामानं मी भिजे
तुझी घरोटा घरोटा
        तशी पाऊ तुझी झिजे

झिजिसनी झिजिसनी
        झाला संगमरवरी
अरे, तुले टाकलाये
        टकारीन आली दारी !

## मन

मन वढाय वढाय
उभ्या पीकातलं ढोर
किती हाकला हाकला
फिरी येतं पिकांवर

मन मोकाट मोकाट
त्याले ठायी ठायी वाटा
जशा वाऱ्यानं चालल्या
पान्यावऱ्हल्यारे लाटा

मन लहरी लहरी
त्याले हाती धरे कोन ?
उंडारलं उंडारलं
जसं वारा वाहादन

मन जह्यरी जह्यरी
याचं न्यारं रे तंतर
आरे, इचू, साप बरा
त्याले उतारे मंतर !

मन पाखरू पाखरू
त्याची काय सांगू मात ?
आता व्हतं भुईवर
गेलं गेलं आभायात



मन चप्पय चप्पय
त्याले नही जरा धीर
तठे व्हयीसनी ईज
आलं आलं धर्तीवर

मन एवढं एवढं
जसा खाकसचा दाना
मन केवढं केवढं ?
आभायात बी मायेना

देवा, कसं देलं मन
आसं नही दुनियात !
आसा कसा रे तू योगी
काय तुझी करामत !

देवा, आसं कसं मन ?
आसं कसं रे घडलं
कुठे जागेपनी तुले
असं सपन पडलं !

## हिरीताचं देनं घेनं

नको लागू जीवा, सदा मतलबापाठी
हिरीताचं देनं घेनं नही पोटासाठी

उभे शेतामधी पिकं
ऊन वारा खात खात
तरसती 'कव्हा जाऊ
देवा, भुकेल्या पोटात'

पेटवा रे चुल्हा आता, मांडा थाटवाटी
नको लागू जीवा, सदा मतलबापाठी

पाहीसनी रे लोकाचे
यवहार खोटे नाटे
तव्हा बोरी बाभयीच्या
आले आंगावर काटे

राखोयीच्यासाठी झाल्या शेताले कुपाटी
नको लागू जीवा, आता मतलबापाठी

किती भरला कनगा
भरल्यानं होतो रिता
हिरीताचं देनं घेनं
नही डाडोराकरता

गेली देही निंघीसनी नाव रे शेवटी
नको लागू जीवा, सदा मतलबापाठी



## लपे करमाची रेखा

लपे करमाची रेखा
माझ्या कुंकवाच्या खाली
पुशीसनी गेलं कुकू
रेखा उघडी पडली.

देवा, तुझ्याबी घरचा
झरा धनाचा आटला
धन-रेखाच्या चन्यानं
तयहात रे फाटला

बापा, नको मारू थापा
असो खऱ्या असो खोट्या
नही नशीब नशीब
तयहाताच्या रेघोट्या !

अरे, नशीब नशीब
लागे चक्कर पायाले
नशिबाचे नऊ गिऱ्हे
ते भी फिरत राह्यले !

राहो दोन लाल सुखी
हेच देवाले मांगनं
त्यात आलं रे नशीब
काय सांगे पंचागन !

नको नको रे जोतिषा,
नको हात माझा पाहू
माझं दैव माले कये
माझ्या दारी नको येऊ !



## आता माझा माले जीव

अरे रडता रडता
डोये भरले भरले
आसू सरले सरले
आता हुंदके उरले !

आसू सरले सरले
माझा मलेच इसावा
असा आसवा बिगर
रडू नको माझ्या जीवा !

सांग सांग धर्ती माता
अशी कशी जादू झाली
झाड गेलं निंधीसनी
मांघे सावली उरली.

देव गेले देवाघरी
आठी ठेयीसनी ठेवा
डोयापुढे दोन लाल
रडू नको माझ्या जीवा !

रडू नको माझ्या जीवा
तुला रड्याची रे सव
रडू हासव रे जरा
त्यात संसाराची चव !

कुकू पुसलं पुसलं
आता उरलं गोंधन
तेच देइन देइन
नशिबाले आवतन.

जरी फुटल्या बांगड्या
मनगटी करतूत
तुटे मंगयसूतर
उरे गयाची शपत.

नका नका आयावाया
नका करू माझी कीव
झालं माझं समाधान
आता माझा माले जीव



## वाटच्या वाटसरा

वाटच्या वाटसरा, वाट बिकट मोठी
नशीबी दगड गोटे
काट्याकुट्याचा धनी
पायाले लागे ठेचा
आलं डोयाले पानी

वरून तापे ऊन
आंग झालं रे लाही
चालला आदवानी
फोड आले रे पायी

जानच पडीन रे
तुले लोकाच्यासाठी
वाटच्या वाटसरा, वाट बिकट मोठी !
दिवस ढयला रे

पाय उचल झट
असो नसो रे तठी
तुझ्या लाभाची गोट

उतार चढनीच्या
दोन्हि सुखादुखात
रमव तुझा जीव
धीर धर मनात
उघडू नको आता

तुझ्या झाकल्या मुठी
वाटच्या वाटसरा, वाट बिकट मोठी !

' माझेज भाऊबंद
घाईसनी येतीन ! '
नको धरू रे आशा
धर एव्हढं ध्यान
तुझ्या पायानें जानं
तुझा तुलेच जीव

लावनी पार आता
तुझी तुलेच नाव
मतलबाचे धनी
सर्वी माया रे खोटी
वाटच्या वाटसरा, वाट बिकट मोठी !

वाऱ्याच वाहादन
आलं आलं रे मोठं
त्याच्यात झुकीसनी
चुकू नको रे वाट

दोन्ही बाजूनं दऱ्या
धर झुडूप हाती
सोडू नको रे धीर
येवो संकट किती
येऊ दे परचीती
काय तुझ्या ललाटी
वाटच्या वाटसरा, वाट बिकट मोठी !



## शेतीची साधने

सरत सरत
करे पेरत पेरत

मोघडा मोघडा
पेरनीचा चवघडा

पांभर पांभर
मांधे धारये झांबर

कोयप कोयप
निंदाईले सोप सोप

आऊत आऊत
आला कमाईले ऊत

तीफन तीफन
व्हये शेताचं मापन

चाहूर चाहूर
आता सरलं काहूर

वखर वखर
घाले मायेची पाखर

नागर नागर
सर्व्या सुखाचं आगर

## आला पाऊस

आला पह्यला पाऊस
शिपडली भुई सारी
धरत्रीचा परमय
माझं मन गेलं भरी

आला पाऊस पाऊस
आता सरीवर सरी
शेतं शिवारं भिजले
नदी नाले गेले भरी

आला पाऊस पाऊस
आता धूमधडाख्यानं
घर लागले गयाले
खारी गेली वाहीसन

आला पाऊस पाऊस
आला लह्करी ठोकत
पोरं निंघाले भिजत
दारी चिल्लाया मारत

आला पाऊस पाऊस
गडगडाट करत
धडधड करे छाती
पोरं दडाले घरात



आता उगू दे रे शेतं
आला पाऊस पाऊस
बऱ्हे येऊ दे रे रोपं
आता फिटली हाऊस

येता पाऊस पाऊस
पावसाची लागे झडी
आता खा रे वडे भजे
घरामंधी बसा दडी

देवा, पाऊस पाऊस
तुझ्या डोयातले आंस
दैवा, तुझा रे हारास
जीवा, तुझी रे मिरास

## पेरनी

पेरनी पेरनी
आले पावसाचे वारे
बोलला पोपया
पेर्ते व्हा रे पेर्ते व्हा रे !

पेरनी पेरनी
आले आभायात ढग
ढगात बाजंदी
ईज करे झगमग

पेरनी पेरनी
आभायात गडगड
बरस बरस
माझ्या उरी धडधड

पेरनी पेरनी
काढा पांभरी मोघडा
झडीन तो झडो
कऱ्हा बर्साती चौघडा

पेरनी पेरनी
आला धरतीचा वास
वाढे पेरनीची
शेतकऱ्या, तुझी आस



पेरनी पेरनी
आता मिरूग बी सरे
बोलेना पोपया
पेर्ते व्हारे पेर्ते व्हारे !

पेरनी पेरनी
भीज भीज धर्ती माते
बीय बियान्याचे
भरून ठेवले पोते

पेरनी पेरनी
अवध्या जगाच्या कारनी
ढोराची चारनी
कोटी पोटाची भरनी

पेरनी पेरनी
देवा, तुझी रे करनी
दैवाची हेरनी
माझ्या जीवाची झुरनी

## देव अजब गारोडी

धरत्रीच्या कुशीमधी
बीयबियानं निजली
वऱ्हे पसरली माटी
जशी शाल पांघरली

बीय टरारे भुईत
सर्वे कोंब आले वऱ्हे
गह्यरलं शेत जसं
आंगावरती शहारे

ऊन वाऱ्याशी खेयता
एका एका कोंबातून
पर्गटले दोन पानं
जसे हात जोडीसन

टाया वाजवती पानं
दंग देवाच्या भजनी
जसे करती कारोन्या
होऊ दे रे आबादानी

दिसामासा व्हये वाढ
रोपं झाली आता मोठी
आला पिकाले बहार
झाली शेतामधी दाटी



कसे वाऱ्यानं डोलती
दाने अले गाडी गाडी
दैव गेलं रे उघडी
देव अजब गारोडी !

## कापनी ( कापणी )

आता लागे मार्गेसर
आली कापनी कापनी
आज करे खालेवऱ्हे
डाव्या डोयाची पापनी !

पडे जमीनीले तढे
आली कापनी कापनी
तशी माझ्या डोयापुढे
उभी दान्याची मापनी

शेत पिवये धम्मक
आली कापनी कापनी
आता धरा रे हिंमत
इय्ये ठेवा पाजवुनी

पिकं पिवये पिवये
आली कापनी कापनी
हातामधी धरा इय्ये
खाले ठेवा रे गोफनी

काप काप माझ्या इय्या,
आली कापनी कापनी
थाप लागली पीकाची
आली डोयाले झापनी !



आली पुढे रगडनी
आता कापनी कापनी
खये करा रे तय्यार
हाती घीसन चोपनी

माझी कापनी कापनी
देवा तुझी रे मापनी
माझ्या दैवाची करनी
माझ्या जीवाची भरनी

## रगडनी [ मळणी ]

केळा पीकाचा रे साठा
 जपीसन सर्व्याआधी
शेता शिवाराचं धन
 आता आलं खयामधी

खय झालं रे तैयार
 सम्दी भुई सारवली
मधी उभारलं मेढं
 पात बैलाची चालली

आता चाल चाल बैला,
 पात चाले गरगर
तसे कनूसामधून
 दाने येती भरभर

आता चाल चाल बैला,
 आता चाल भिरभिरा
व्हऊ दे रे कनूसाचा
 तुझ्या खुराखाले चुरा

पाय उचल रे बैला,
 कर वापा आता घाई
चाटू दे रे रगडनं
 तुझ्या पायाची पुन्याई ?



पाय उचल रे बैला,
 कनूसाचा कर भूसा
दाने एका एकातून
 पडतील पसा पसा

आता चाल चाल बैला,
 पुढे आली उपननी
वारा चालला रे वाया,
 कसा ठेवू मी धरूनी

आता सोडी देल्ही पात
 बैलं गेले चाऱ्यावरी
डोयापुढे उपननी
 जीव माझा वाऱ्यावरी

रगडनी रगडनी
 देवा, तुझी रे घडनी
देवा तुझी झगडनी
 माझी डोये उघडनी !

## उपननी

उपननी उपननी
आता ध्या रे पाव्हा हाती
राहा आता उपन्याले
उभे तिव्हारीवरती.

चल ये रे ये रे वाऱ्या,
ये रे मारोतीच्या बापा
नको देऊ रे गुंगारा
पुऱ्या झाल्या तुझ्या थापा !

नही अझून चाहूल
नको पाडू रे घोरात
आज निंबाळी कोनाची
वाऱ्यावरती वरात ?

ये रे वाऱ्या धोंगावत
ये रे खयाकडे आधी
आज कुठे रे शिरला
वासराच्या कानामधी !

भिनभिन आला वारा
कोन कोनाशी बोलली ?
मन माझं हारखलं
पानं झाडाची हालली !



वारा आलारे झन्नाट्या
झाडं झुडपं डोलली
धरा मदनाच्या पाव्हा
खाले पोखरी चालली

देवा, माझी उपननी
तुझ्या पायी इनवनी
दैवा, तुझी सोपवनी
माझ्या जीवाची कारोनी



G-4508

## मोट हाकलतो एक

येहेरीत दोन मोटा
दोन्हीमधी पानी एक
आडोयाले कना, चाक
दोन्हीमधी गती एक

दोन्ही नाडा–समदूर
दोन्हीमधी झीज एक
दोन्ही बैलांचं ओढणं
दोन्हीमधी ओढ एक

उतरनी–चढनीचे
नाव दोन धाव एक
मोट हाकलतो एक
जीव पोसतो कितीक ?



## खोप्यामधी खोपा

[ सुग्रण पक्षिणीला खोपा विणता येतो. त्यात ती चतुर असते. परंतु तिच्या नराला मात्र खोपा विणता येत नाही. तो फक्त गवताच्या काड्या, तंतू वगैरे आणून देतो. हा खोपा ( घरटे ) झाडाला टांगलेला असतो. ]

अरे खोप्यामधी खोपा
सुगरणीचा चांगला
देखा पिलासाठी तिनं
झोका झाडाले टांगला

पिलं निजले खोप्यात
जसा झुलता बंगला
तिचा पिलामधी जीव
जीव झाडाले टांगला !

सुगरीन सुगरीन
अशी माझी रे चतुर
तिले जल्माचा संगाती
मिये गन्यागंप्या नर

खोपा इनला इनला
जसा गिलक्याचा कोसा
पाखराची कारागिरी
जरा देख रे मानसा !

तिची उलूशीच चोच
तेच दात, तेच ओठ
तुले देले रे देवानं
दोन हात दहा बोटं ?

## गाडी जोडी

माझ्या लाल बैलायूची जोडी रे
कशी गडगड चाले गाडी
एक रंगी एकज शिंगी
एकज चन्‌का यांचे अंगी

दिसे डौलदार ते खांदे रे
तसे सरीलाचे बांधे
माझ्या बैलायूची चालनी रे
जशी चप्पय हरनावानी

माझ्या बैलायूची ताकद्‌ रे
साखयदंडाले माहित
दमदार बैलाची जोडी रे
तिले साजे गुंढ्यगाडी

कशि गडगड चाले गाडी रे
माझी लाल बैलायूची जोडी
कसे टन्‌ टन्‌ करती चाकं रे
त्याले पोलादाचा आंख

सोभे वरती रंगित खादी रे
मधी मसूऱ्याची गादी
वऱ्हे रेसमाचे गोंडे रे
तिचे तीवसाचे दांडे



बैल हुर्पाटले दोन्ही रे
चाकं फिरती भिंगरीवानी
मारे ललकारी धुर्करी ना—
लागे पुऱ्हानं ना आरी

अशी माझी गुंढ्यगाडी रे
तिले लाल बैलायूची जोडी

## गुढी उभारनी

गुढीपाडव्याचा सन
आता उभारा रे गुढी
नव्या वरसाचं देनं
सोडा मनातली आढी

गेलं साली गेली आढी
आता पाडवा पाडवा
तुम्ही येरांयेरांवरी
लोभ वाढवा वाढवा

अरे, उठा झाडा आंग
गुढीपाडव्याचा सन
आता आंगन झाडूनी
गेली राधी महारीन

कसे पडले घोरत
असे निरसयेलावानी
हां हां म्हनता गेला रे
रामपहार निंघूनी

आता पोथारा रे घर
सुधारा रे पडझडी
करीसन सारवन
दारी उभारा रे गुढी



चैत्राच्या या उन्हामधी
जीव व्हये कासाईस
रामनाम घ्या रे आता
रामनवमीचा दीस

पडी जातो तो 'पाडवा'
करा माझी सुधारनी
आता गुढीपाडव्याले
म्हना 'गुढी उभारनी'

काय लोकाचीबी तऱ्हा
कसे भांग घोटा पेल्हे
उभा जमीनीच्या मधी
आड म्हनती उभ्याले

आस म्हनू नही कधी
जसं उभ्याले आडवा
गुढी उभारतो त्याले
कसं म्हनती पाडवा ?

## आखजी ( अक्षय तृतीया )

आखजीचा आखजीचा
 मोलाचा सन देखा जी
निंबावरी निंबावरी
 बांधला छान झोका जी

माझा झोका माझा झोका
 चालला भिरभिरी जी
माझा झोका माझा झोका
 खेयतो वाऱ्यावरी जी

गेला झोका गेला झोका
 चालला माहेराले जी
आला झोका आला झोका
 पलट सासराले जी

माझा झोका माझा झोका
 जीवाची भूक सरे जी
भूक सरे भूक सरे
 वाऱ्यानं पोट भरे जी

आला वारा आला वारा
 वाऱ्यानं जीव झुले जी
जीव झुले जीव झुले
 झाडाची डांग हाले जी



डांग हाले डांग हाले
 नजर नही ठरे जी
झाली आता झाली आता
 धरती खालेवऱ्हे जी

आंगनात आंगनात
 खेयती पोरीसोरी जी
झाल्या दंग झाल्या दंग
 गाऊनी नानापरी जी

झाला सुरू झाला सुरू
 पहिला माझा पिंगा जी
फुगड्यांचा फुगड्यांचा
 चालला धांगडधिंगा जी

दारोदारी दारोदारी
 खेयाची एक घाई जी
घरोघरी घरोघरी
 मांडल्या गवराई जी

गवराई गवराई
 सजव सजवल्या जी
संगातीनी संगातीनी
 बोलव बोलवल्या जी

बोलवल्या बोलवल्या
 टिपऱ्या झाल्या सुरू जी
टिपऱ्याचे टिपऱ्याचे
 नादवले धुंगरू जी

किती खेय किती खेय
सांगू मी काय काय जी
खेयीसनी खेयीसनी
आंबले हातपाय जी

चार दीस चार दीस
इसावल्या घरात जी
आहे पुढे आहे पुढे–
शेतीची मशागत जी

सन सरे आस उरे
आखजी गेली व्हयी जी
सांग सई सांग सई,
आखजी आता कही जी ?



## सासुरवाशीन

उठ सासुरवाशिन बाई
उठ मध्यम राती मांड दयन तू नीट
अन् चालव बाई घरोट

उठ सासुरवाशिन बाई
उठ राम पहारी डोईवर घे घडा
उठ बांग फुके कोंबडा

उठ सासुरवाशिन बाई
उठ सयपाकाले पेटव पेटव चुल्हा
वर सूर्याबापा आला

उठ सासुरवाशिन बाई
उठ जानं शेती कामाचा किति घोर
तू गोठ्यामधलं ढोर

उठ सासुरवाशिन बाई
सुरू झाली बटवट कातवली वो सासू
पुस डोयांमधले आसू

उठ सासुरवाशिन बाई
घे सोशीसन घे घालु नको वो वाद
कर माहेराची याद